बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक १७ | बुधवार,दि.०२ एप्रिल २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## बंद पडलेले शासकीय दूध शीतकरण केंद्र सुरू करण्यासाठी हालचाली

### नव्याने दुग्ध उत्पादक सहकारी संस्था स्थापन करणार : दुग्ध उत्पादकांना दिलासा

**सडक अर्जुनी–** गोंदिया जिल्हा दुग्ध उत्पादक सहकारी संस्थांच्या संघाकडून दुधाचे विक्री केलेले चुकारे थकल्याने अनेक प्राथमिक दुग्ध उत्पादक सहकारी संस्था डबघाईस येऊन बंद पडल्या आहेत. संस्थांचा संघसुद्धा बंद पडून दूध पुरवठा बंद झाल्याने शासकीय शीतकरण केंद्र बंद पडले होते. हे बंद पडलेले शीतकरण केंद्र सुरू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या असून, नव्या दुग्ध उत्पादक सहकारी संस्था स्थापन करण्याच्या प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

जुन्या अवसानात निघालेल्या व बंद पडलेल्या संस्था पुनर्जीवित करण्यासाठी संघाला संस्थाचे चुकारे देण्यास भाग पाडण्याऐवजी बंद पडलेले दुग्ध शीतकरण केंद्र सुरू करण्यासाठी नव्या दुग्धोत्पादक सहकारी संस्था उघडण्यास मान्यता देऊन संस्था सुरू करा. तसेच जुन्या सहकारी संस्थांचे दूध विक्रीचे थकलेले चुकारे आधी देण्यात यावे, अशी मागणी बंद पडलेल्या दुग्ध उत्पादन सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाने केली आहे.



### नऊ दुग्ध उत्पादक सहकारी संस्थांना परवानगी

**सडक अर्जुनी तालुक्यातील कोहमारा येथील शासकीय दूध शीतकरण केंद्र सुरू करण्यासाठी आ. राजकुमार बडोले यांनी पुढाकार घेतला आहे. सहायक निबंधक सहकारी संस्था दुग्ध भंडारा अंतर्गत जिल्हा दुग्धविकास अधिकारी भंडारा यांच्या कार्यालयामार्फत सडक अर्जुनी तालुक्यात एकूण नऊ दुग्ध उत्पादक सहकारी संस्थेचे नाव आरक्षित करण्यास व बँकेत खाते उघडण्यास परवानगी देण्यात आली आहे.**

### सहकार झाला स्वाहाकार

**एकत्रित भंडारा जिल्हा उत्पादन सहकारी संस्थांच्या संघाचे गोंदिया जिल्हा निर्मितीनंतर विभाजन होऊन गोंदिया जिल्हा दुग्ध उत्पादक सहकारी संस्थांचा संघ स्थापन झाला. जिल्ह्यात कोहमारा व गोंदिया अशा दोन ठिकाणी दूध शीतकरण केंद्र असून, संघामार्फत दुधाचा पुरवठा केला जात होता. संघामार्फत शासनाला दूध विक्री होत असल्याने शासनाकडून संघाला, तर संघाकडून संस्थांना व संस्थाकडून दुग्ध उत्पादकांना चुकारे दिले जात होते. सर्व सुरळीत सुरू असतानाच २१ जुलै २०१९ ते २० सप्टेंबर २०१९ अशा दोन महिन्यांच्या कालावधीतील संस्थांनी पुरवठा केलेल्या दुधाचा संघाकडून चुकारेच अदा करण्यात आले नाही. परिणामी संस्था डबघाईस आल्या दुग्ध उत्पादकांचे वेळेवर चुकारे अदा करण्यास संस्था असमर्थ ठरल्याने चुकारे मिळत नसल्याने उत्पादकांनी संस्थेचा दूध पुरवठा बंद केला. संस्थांनी संघाला, तर संघाने शीतकरण केंद्राला दूध पुरवठा बंद केला, त्यामुळे संपूर्ण साखळीच विस्कळीत झाली व सर्वच कार्यालयाला टाळे लावण्याची वेळ आली.**



### संस्था संचालकांनी केला पाठपुरावा

**दूध खरेदीचे शासनाकडून सर्वच चुकारे संघाला अदा करण्यात आले. मात्र, संघाकडून संस्थांना चुकारे अदा करण्यात आले नाही. सडक अर्जुनी तालुक्यातील एकूण ९ संस्थांचे ८४०४३१ रुपयांचे चुकारे थकले आहे. अर्जुनी मोरगाव तालुक्यातील संस्थांचा आकडा मोठाच आहे. संघाने थकविलेली रक्कम संस्थांना मिळावी म्हणून शासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करून पाठपुरावा करण्यात आला मात्र याची अजूनही दखल घेण्यात आली नसल्याचा आरोप संस्थेच्या संचालक मंडळाने केला आहे.**

सात वर्षापूर्वी गोंदिया जिल्ह्यात दुधाची गंगा वाहत होती.

जिल्ह्यात मुबलक प्रमाणात चारा पाण्याची सोय असल्याने शेतीला जोडधंदा म्हणून शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर दुधाळू जनावरांचे संगोपन करून दुग्ध व्यवसायाकडे वळले होते. शासनाकडून दूध खरेदी होत असल्याने दूध उत्पादनात वाढ होऊन गावागावांत प्राथमिक दुग्ध उत्पादन सहकारी संस्था स्थापन झाल्या.

प्राथमिक दुग्ध उत्पादन सहकारी संस्थांच्या संघामार्फत शासकीय दूध शीतकरण केंद्र दूध विक्री केल्या जात होती. दूध उत्पादक ते सहकारी संस्था संघ ते संघ ते शासन अशी एक साखळी तयार होऊन दुग्ध व्यवसाय एक क्रांती आली होती व या हजारो लोकांना रोजगारही उपलब्ध झाला होता.

## भाजपचा नवा राष्ट्रीय अध्यक्ष कोण होणार?



**नवी दिल्ली:–**भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार? याची सध्या चर्चा सुरु आहे. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे नड्डा यांचा कार्यकाळही संपला आहे. भाजपचा नवा राष्ट्रीय अध्यक्ष याच आठवड्यात ठरण्याची शक्यता आहे. पक्षाच्या स्थापना दिनाआधी भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्ष जाहीर करण्यावर भाजपचा भर असल्याची माहिती समोर आली आहे. संघटनात्मक नाव नोंदणी पूर्ण झाल्याने अध्यक्षांचे नाव आता जाहीर होणार आहे.

२०१४ साली देशात भाजपाची सत्ता आल्यानंतर राष्ट्रीय अध्यक्षपदी अमित शाह विराजमान झाले होते. त्यानंतर २०१९ मध्ये भाजपच्या अध्यक्षपदी जे. पी. नड्डा यांची निवड झाली होती. त्यांच्या कार्यकाळात महत्त्वाचे निर्णयही घेण्यात आले. नड्डा यांनी पक्षाध्यक्षपदाची धुरा स्वीकारल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्याबरोबर प्रभावी कार्यसंबंध प्रस्थापित केले. भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा सांभाळताना नड्डा यांनी आपली उपयुक्तता सिद्ध करून दाखवली होती. पक्षात त्यांना एक चांगला वक्ता म्हणून ओळख मिळाली. आता त्यांचा कार्यकाळ संपला आहे. त्यामुळे भाजपातील चार महत्त्वाची नावे या पदासाठी चर्चेत आहेत.

### ही नावे आहे चर्चेत

भाजप अध्यक्षपदासाठी भूपेंद्र यादव, धर्मेंद्र प्रधान,शिवराजसिंह चव्हाण, विनोद तावडे, डी पुरंदरेश्वरी यांची नावे आघाडीवर असल्याचं समजते. ६ एप्रिलला भाजपाचा स्थापना दिवस आहे. त्यामुळे या दिवशी नाव जाहीर होण्याची शक्यता आहे. आता यामधील भाजपच्या अध्यक्षपदी कुणाच्या नावाची वर्णी लागणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. भाजपच्या नव्या अध्यक्षाबाबत सर्वांना उत्सुकता लागली आहे.

दरम्यान, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान नड्डा यांनी भाजपा आता स्वयंपूर्ण असून पक्षाला पूर्वीप्रमाणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची आवश्यकता नाही असे विधान केले होते, ज्यामुळे भाजपा आणि आरएसएसमधील मतभेद उघड झाले आणि त्याचा परिणाम पक्षाच्या कामगिरीवर झाला होता.

## राज्य सरकारचा मोठा निर्णय,शेतकऱ्यांना मिळणार अनुदान

**गोंदिया–**महाराष्ट्र सरकारने राज्यातील आदिवासी कुटुंबांचे आरोग्य आणि आर्थिक स्तर उंचावण्यासाठी “आदिवासी परसबाग लागवड योजनेला’ गती देण्याचा निर्णय घेतला आहे. याअंतर्गत, २०२३–२४ या आर्थिक वर्षासाठी ४ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील १४ प्रमुख आदिवासी जिल्ह्यांमधील शेतकरी कुटुंबांना त्यांच्या घराच्या परसदारी फळझाडे आणि भाजीपाला लागवडीसाठी अनुदान, बियाणे आणि तांत्रिक मार्गदर्शन पुरवले जाणार आहे.

### योजनेचा उद्देश आणि लाभार्थी जिल्हे

आदिवासी समाजातील कुपोषणाची गंभीर समस्या लक्षात घेऊन, त्यावर मात करण्याच्या उद्देशाने २००३–०४ पासून ही परसबाग योजना सुरू करण्यात आली होती. ताज्या आणि पौष्टिक भाजीपाल्याचा सहज पुरवठा व्हावा, आदिवासी कुटुंबांनी स्वयंपूर्ण बनावे, स्थानिक पातळीवर शेतीला प्रोत्साहन मिळावे आणि उत्पन्नाचा एक छोटा स्रोत निर्माण व्हावा, हे या योजनेचे प्रमुख उद्देश आहेत.

ही योजना राज्यातील ठाणे, पालघर,पुणे,नाशिक,धुळे, नंदुरबार,जळगाव,अहमदनगर, नांदेड , यवतमाळ, गडचिरोली , चंद्रपूर , अमरावती आणि गोंदिया या १४ आदिवासी लोकसंख्या असलेल्या जिल्ह्यांमध्ये प्रामुख्याने



राबविण्यात येणार आहे. शासनाने स्पष्ट केले आहे की, मंजूर केलेला निधी केवळ याच योजनेसाठी आणि याच जिल्ह्यांतील आदिवासी कुटुंबांसाठी वापरला जाईल. खर्चाचा तपशील आणि हिशोब दर महिन्याच्या १० तारखेला सादर करणे अधिकाऱ्यांवर बंधनकारक असेल.


या योजनेची अंमलबजावणी स्थानिक पातळीवर कृषी विभाग आणि आदिवासी विकास विभागाच्या समन्वयाने केली जाईल. सुरुवातीला लाभार्थी कुटुंबांची निवड केली जाईल. निवड झालेल्या कुटुंबांना परसबागेत भाजीपाला आणि फळझाडे लावण्यासाठी आवश्यक मदत, जसे की बियाणे, रोपे आणि खते, पुरवली जातील. केवळ लागवड करून न थांबता, झाडांची योग्य वाढ आणि निगा कशी राखावी, यासाठी तांत्रिक मार्गदर्शनही दिले जाणार आहे.

आदिवासी शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचे महत्त्व पटवून देण्यासाठी आणि त्यासंबंधीचे प्रशिक्षण देण्याचाही योजनेत समावेश आहे. या योजनेमुळे आदिवासी कुटुंबांना अनेक थेट फायदे मिळतील. त्यांना घराच्या जवळच ताजा, रसायनमुक्त भाजीपाला आणि फळे उपलब्ध होतील, ज्यामुळे त्यांच्या आहाराचा दर्जा सुधारेल आणि कुपोषणाची समस्या कमी होण्यास मदत होईल. परसबागेतील अतिरिक्त उत्पादन स्थानिक बाजारात विकून त्यांना उत्पन्नाचा एक छोटा पण निश्चित स्रोत मिळू शकेल. तसेच, त्यांना निसर्गाशी सुसंगत आणि पारंपरिक शेती पद्धतींचा अनुभव मिळेल. शासनाच्या या पुढाकारामुळे आदिवासी समाजाला पौष्टिक आहार आणि आर्थिक आधार मिळण्यास मदत होणार आहे.

## नागझिरा व्याघ्र प्रकल्पात आढळले दुर्मीळ युरेशियन पाणमांजर

**गोंदिया :–** नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पात सध्या कॅमेरा ट्रॅपच्या माध्यमातून वार्षिक व्याघ्र गणना सुरू आहे. त्यासाठी प्रकल्पाच्या गाभा व बफर क्षेत्रात कॅमेरा ट्रॅप लावण्यात आले आहेत. त्यात दुर्मीळ समजल्या जाणाऱ्या युरेशियन पाणमांजर प्राण्याची कोका वनपरिक्षेत्रात पहिली छायाचित्रणात्मक नोंद झाली आहे.

नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्प व संलग्न भूप्रदेशात या युरेशियन ऑटर (युरेशियन पाणमांजर) या प्रजातीचा पहिलाच छायाचित्रणात्मक पुरावा आहे. चॅम्पियन व सेठ यांच्या भारतीय जंगलांच्या वर्गीकरणानुसार हे क्षेत्र



उष्णकटीबंधीय शुष्क पानझडी वन या वर्गात मोडते.

निरोगी उभयचर पर्यावरणाचे सूचक म्हणून काम करून गोड्या पाण्यातील आणि किनारी परिसंस्था राखण्यात पाणमांजर महत्त्वाची भूमिका बजावतात. भारतात पाणमांजराच्या तीन

### १९७८ मध्ये मारुती चितमपल्ली यांनी घेतली नोंद

**भारतात युरेशियन पाणमांजराचे वितरण प्रामुख्याने हिमालयीन पायथ्याशी, पश्चिम घाट आणि ईशान्य भारतातील काही भागात आढळते. महाराष्ट्रातील प्रसिद्ध निसर्गशास्त्रज्ञ लेखक आणि वन अधिकारी पद्मश्री मारुती चितमपल्ली यांनी या क्षेत्रात कार्यरत असताना १९७८ मध्ये सध्याच्या गोंदिया जिल्ह्याच्या दक्षिणेकडील भागात या प्रजातीची शेवटची नोंद केली होती. या व्याघ्र प्रकल्पातील उपस्थितीची ही पहिलीच छायाचित्रीत नोंद आहे. युरेशियन पाणमांजर आणि त्याच्या अधिवासाचे संरक्षण या प्रकल्पाच्या माध्यमातून केले जाणार आहे.**

प्रजाती आढळतात. तिन्ही प्रजाती वन्यजीव (संरक्षण) कायदा, १९७२, अनुसूची १ अंतर्गत संरक्षित आहे.

आंतरराष्ट्रीय निसर्ग संवर्धन संघाद्वारे धोकाग्रस्त असे वर्गीकृत आहे. व्याघ्र गणनेच्या फेज–चौथ्या टप्प्यातील सर्वेक्षण आणि विश्लेषण नवेगाव नागझिरा व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानअंतर्गत वन्यजीव जीवशास्त्रज्ञ म्हणून कार्यरत अंकित ठाकूर यांनी क्षेत्रसंचालक जयराम गौडा आर, उपसंचालक पवन जेफ यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

## सिंगापूरच्या धर्तीवर शिक्षण कठीणच!

### दौऱ्यावर गेलेल्या राज्यातील शिक्षकांचा प्राथमिक अहवाल; अपुऱ्या पदांमुळे अडचण



**गोंदिया:–**सिंगापूरच्या धर्तीवर राज्यात शिक्षण पद्धती लागू करणे कठीणच आहे. सिंगापुरात प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र शिक्षक आहे. आपल्याकडे एकच शिक्षक सर्व विषय शिकवित असल्याने विद्यार्थ्यांना अपेक्षित कौशल्य मिळिवण्यात अडचणी येतात, अशी माहिती सिंगापूर दौऱ्यावर गेलेल्या शिक्षकांनी “बेरार टाईम्शी’शी बोलताना दिली आहे.



जागतिक पातळीवरील शिक्षण पद्धती आणि एकवीसाव्या शतकातील शैक्षणिक कौशल्य अनुभवण्यासाठी राज्यातील ५० शिक्षक सिंगापूर दौऱ्यावर गेले होते. शिक्षण विभागाच्या “स्ट्रेंथनिंग टीचिंग–लर्निंग अँड रिझल्ट्स फॉर स्टेट्स (स्टार्स) प्रकल्पांतर्गत दौरा नियोजित करण्यात आला होता. राज्यभरातून निवड करण्यात आलेल्या या शिक्षकांनी सिंगापूरमधील शिक्षण व्यवस्था जाणून घेतली. शिक्षणाचे अनुभव, अनुभवात्मक शिक्षण, गट अध्यापन, समस्या सोडवण्याच्या पद्धती आणि प्रकल्प–आधारित शिक्षण यांची ओळख करून घेतली. लवकर हे शिक्षक आपला अहवाल राज्य सरकारला सादर करणार आहे. या अहवालानंतर सिंगापूरमधील चांगल्या बाबींची अंमलबजावणी संबंधित शिक्षक आपल्या शाळांमध्ये सुरुवातीला करणार आहेत. यानंतर त्याचे यशापयश पाहून इतर शाळांमध्ये अंमलबजावणी केली जाईल. तरी–ही सिंगापूरच्या धर्तीवर आपल्या राज्यात शिक्षण कठीण असल्याचे ठाम मतही त्यांनी मांडले आहे.

आजच्या घडीला सिंगापूरमध्ये फक्त ३६५ शासकीय शाळा आहेत. परदेशातून आलेल्यांच्या पाल्यांकरिता मोजक्या दहा ते पंधरा खासगी शाळा आहेत. शिक्षक नियुक्त करताना आपल्याकडे डीएड, बीएड हे शिक्षकांकरिता अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक आहे. सिंगापूरमध्ये अशा शिक्षणाची अट नाही. संबंधिताकडे विशेष शिक्षण नसेल आणि उत्कृष्ठ शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासात भर घालू शकत असल्यास किंवा इतर कौशल्यांत निपूण असल्यास त्याची निवड करून प्रशिक्षण देत शिक्षक म्हणून नेमले जाते. त्यामुळे व्यवसायिक कौशल्यात

### “कार्य परिणामावर शिक्षकांना पदोन्नती”

**सिंगापूरमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याची प्रगती व्हावी या हेतूने सर्व शिक्षक कार्य करतात. वयाच्या सातव्या वर्षी प्राथमिक शिक्षणाला सुरुवात होते. सहा वर्षांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करून राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा पास करावी लागते. त्यानंतर विद्यार्थी आपापल्या आवडीनुसार माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी पात्र ठरतात. शिक्षकांचे मूल्यांकन होत असते. एखादा नावीन्यपूर्ण उपक्रम एखाद्या शिक्षकाने सादर केल्यास संबंधित शिक्षकाला बोनसचीसुद्धा व्यवस्था करण्यात आली आहे. कोणत्याही प्रकारची सेवाज्येष्ठता लक्षात न घेता कार्य परिणामावर आधारित पदोन्नती दिली जात असल्याची माहिती गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा खर्राचे शिक्षक नरेंद्रकुमार गौतम यांनी दिली.**



निपूण व्यक्तीची निवड ही तेथील शिक्षणाचा दर्जा उंचावणारी दिसून येते. सर्वसामान्यांपासून वरिष्ठांपर्यंतच्या प्रमुखांची मुले ही शासकीय शाळेतच शिक्षण घेतात. तसे चित्र आपल्याकडे सध्या तरी नाही. दोन्ही प्रदेशातील शैक्षणिक परिस्थितीचा अहवाल प्रत्येक शिक्षक आपल्या परीने सरकारला देणार आहे. त्यांच्याच माध्यमातून राज्यातील काही शिक्षकांना प्रशिक्षण देऊन मोजक्या शाळांमध्ये सुरुवातीला सिंगापूरसारख्या शिक्षण पद्धतीचा अवलंब करण्याचे राज्य सरकारचे नियोजन आहे.

सिंगापूरमध्ये प्रत्येक विषयाकरिता स्वतंत्र शिक्षक आहे. यासोबतच व्यवसायिक अभ्यासक्रमाकरिताही स्वतंत्र शिक्षक नियुक्त करण्यात आले आहेत. सबंधित शाळेतील विद्यार्थ्याला एखादा विषय न कळल्यास, गोंधळलेला असेल तर संबधित विषयाबद्दल विद्यार्थ्याचे पूर्ण समाधान वर्गातच केले जाते. ती गोष्ट विद्यार्थ्याला यायलाच हवी याकडे कटाक्ष असतो, असेही शिक्षकांनी सांगितले.

## मालमत्ता कर थकबाकीदारांनो सावधान! वसुलीसाठी नगर परिषद ॲक्शन मोडवर

**गोंदिया :–** मालमत्ता कर थकबाकीदारांविरुद्ध कठोर भूमिका घेत तिरोडा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अमोल मालकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थावर मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या कारवाईमुळे कर थकबाकी दारांमध्ये खळबळ निर्माण झाली आहे.

तिरोडा न.प. अंतर्गत रविवारी ६ थकबाकीदारांवर जप्तीची कारवाई करताना त्यांच्याकडून सोफा सेट, खुर्ची, वजन काउंटरसह स्थावर मालमत्ता जप्त करण्यात आली.

तिरोडा नगरपरिषदेने थकबाकीदारांना वेळेवर कर भरण्यासाठी अनेक नोटिसा दिल्या आहेत आणि त्यांना कराच्या नोटिसाही दिल्या आहेत. असे असतानाही अनेक वर्षांपासून कराचा भरणा न करणाऱ्या थकबाकीदार याकडे दुर्लक्ष करत असून, याकडे नगर परिषद प्रशासनाने नियमानुसार थकबाकीदारांची यादी तयार करून विहित मुदतीत कर भरण्यास सांगितले आहे. करिता नोटीस दिली होती. नगरपरिषदेचे असे १९ थकबाकीदार आहेत, ज्यांच्यावर १२ लाखांहून अधिक कर अनेक वर्षांपासून थकीत आहे.

वारंवार माहिती देऊनही कर थकबाकीदार याकडे दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे नियमानुसारच ही जप्तीची कारवाई करण्यात येत आहे, अशी माहिती तिरोडा




नगर परिषदेचे कर निरीक्षक रुतुंजय कांबळे यांनी दिली. वेळेवर कर भरून नगरपरिषदेच्या विकासकामांना सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

### गोंदिया नगर परिषदेकडून ८८ मालमत्ताधारकांना नोटीस

गोंदिया नगर परिषदेच्या मालमत्ता करापोटी ९ कोटी ४२ लाख रुपये थकीत आहेत. मालमत्ता कर भरण्यासाठी मालमत्ताधारकांना वारंवार सूचना देऊनही ते याकडे दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे नगर परिषदेने आता मालमत्ता कर वसुलीसाठी धडक मोहीम सुरू केली आहे. याच अंतर्गत शहरातील बड्या ८८ मालमत्ताधारकांना नोटीस बजावली आहे.

३५ टक्क्यांपेक्षा कमी मालमत्ता करवसुली झाल्यास नगरविकास विभाग नगर परिषदेला दिल्या जाणाऱ्या अनुदानाला कात्री लावते. गोंदिया नगर परिषदेसाठी मालमत्ता करवसुली ही नेहमीच डोकेदुखीची बाब आहे. शहरात सद्यःस्थितीत ८४ हजारांवर मालमत्ताधारक आहेत; पण नगर परिषदेच्या रेकॉर्डवर केवळ ४५ हजार मालमत्ताधारकांचीच नोंद आहे. शहरातील मालमत्ताधारकांचे सर्वेक्षण करण्यासाठी मंजुरी मिळाली आहे. पण त्याचे घोडे नेमके कुठे अडले आहे हे कळण्यास मार्ग नाही. परिणामी नगर परिषदेवरील आर्थिक भार वाढत आहे.

सन २०२५–२६ करिता नगर परिषदेला ९ कोटी ४२ लाख रुपयांच्या मालमत्ता करवसुलीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे; पण आत्तापर्यंत केवळ २४ टक्केच मालमत्ता करवसुली झाल्याची माहिती आहे. त्यामुळे आता नगर परिषदेने शहरातील बड्या थकबाकीदारांची यादी तयार करून त्यांना नोटीस देण्यास सुरुवात केली आहे. याच अंतर्गत आतापर्यंत ८८ मालमत्ताधारकांना न.प.ने नोटीस बजावली आहे. नोटीसनंतरही मालमत्ता कर न भरल्यास त्यांच्यावर मालमत्ता जप्तीची कारवाई केली जाणार आहे.

साप्ताहिक बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार, दि.२ एप्रिल २०२५ 

## संपादकीय

### अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी नको

अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा व्यक्तिगत स्वातंत्र्याप्रमाणेच लोकशाही मूल्यांवर आधारित मूलभूत मानवी अधिकार. स्वतःस अभिव्यक्त करता येणे म्हणजेच अभिव्यक्ती. माध्यम कोणतेही असले तरी, अभिव्यक्ती स्वातंत्र्य या शब्दाने केवळ बोलण्याचेच नव्हे, तर माहिती किंवा कल्पना हवी असणे, मिळवणे आणि देणे यांचे स्वातंत्र्यही अभिप्रेत असते. मानवाधिकाराचे वैश्विक घोषणापत्र कलम १९ अनुसार प्रत्येकास मतस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य असण्याचा अधिकार आहे. या अधिकारात कोणतीही ढवळाढवळ न होता, ते मत बाळगण्याला स्वातंत्र्याचा अधिकार असतो. हे स्वातंत्र्य म्हणजे व्यक्त होण्याची मुक्तता असणे, अशी व्याख्या भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ मध्ये करण्यात आली आहे. ही झाली कायद्याची चौकट; परंतु अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली हजारो लोकांच्या मतांवर निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधींची बदनामी केली, तर त्यांच्या समर्थकांच्या भावना दुखावून, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर? हो, असे घडले ते स्टड अप कॉमेडियन कुणाल कामराच्या एका गाण्यामुळे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील व्यंगात्मक गाण्यानंतर राजकीय वतुर्ळात वाद सुरू झाला.

याप्रकरणी शिवसैनिकांनी कुणाल कामराच्या खारमधील स्टुडिओची मोडतोड केली. महाराष्ट्राच्या विधिमंडळातदेखील त्याचे पडसाद उमटले. दोन्ही सभागृहाचे कामकाज स्थगित करण्याची वेळ आली. विधान परिषद सभागृह शांत करण्यासाठी कुणाल कामराची किंवा इतर कोणाचीही अशा प्रकारची कॉमेडी चालवून घेतली जाणार नाही, असा इशारा गृहराज्यमंत्री योगेश कदम यांना द्यावा लागला.मात्र कंगणा रनौत,माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी,प्रशांत कोरटकर,सोलापूरकर सारखे लोकं जेव्हा बहुजनाच्या महापुरुषावर आणि विरोधी पक्षाच्या नेत्यावर असभ्य भाषेत बोलतात,तेव्हा भाजपच्या लोकांना मात्र अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे कुणी हनन करु नये असे वाटते.कशाला कंगणा रनौत यांनी जेव्हा शेतकरी व काँग्रेसच्या नेत्यावर टिप्पणी केली तेव्हा विद्यमान उपमुख्यमंत्री विरोधी पक्षात असताना कंगणाची बाजू घेत अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेता येत नाही असे सभागृहात बोलले मग आज आपली भूमिका कशी काय बदलली.सोनिया गांधीबद्दल भाजपचे अनेक नेते अपशब्द बोलतात तेव्हा अभिव्यक्ती स्वातंत्र्य कुठं जाते याचाही विचार व्हायला हवे. २०१७ साली महापालिका निवडणुकीच्या आधी मुंबईतील रस्त्यांच्या दुर्दशेबाबत रेडिओ जॉकीने गायलेले गाणे खूप गाजले होते. "सोनू तुला बीएमसीवर भरवसा नाय काय:' असे ते गाणे होते. हे गाणे मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर शिवसेनेचा प्रचंड तीळपापड झाला होता. त्यावेळी त्या महिला रेडिओ जॉकीला दमदाटी करण्याचे प्रकार झाले. मात्र, आता तेच कुणाल कामराला खांद्यावर घेऊन नाचताना दिसत आहेत असे जे म्हणतात.त्यांनी अजित पवारांनी तर जाहिररित्या बोलले मग का गप्प राहिले.कोश्यारीनी क्रांतीज्योती सावित्रीमाईबद्दल अपमानास्पद बोलले तेव्हा कुठे लपले होते,त्यामुळे आपल्या सोयीने अभिव्यवक्ती स्वातंत्र्याची रचना करुन सामान्याचा आवाज दाबण्याचे षडयंत्र हाणून पाडण्याची वेळ आली आहे.

कुणाल कामरा सध्या महाराष्ट्राबाहेर आहे. मुंबई पोलिसांनी त्याला समन्स पाठवून चौकशीला हजर राहण्याचे सांगितले आहे. तरीही, तो आपण माफी मागणार नाही, या मतावर ठाम आहे.विशेष म्हणजे मुंबई पोलिसांनी तर चक्क कायद्याची पातळ्याची ओलांडत प्रेक्षकांनाही नोटीस पाटवून काय सिध्द केलंय हेच कळेनेसा झाले. संविधानाची प्रत हातात घेऊन कामराने अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आपला अधिकार असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे ही त्याची मस्ती की, प्रसिद्धीचा स्टंट म्हणायचा, हे लवकरच कळेल. त्याचे कारण, सतत प्रकाशझोतात राहण्यासाठी अनेक जण नकारात्मक प्रसिद्धीचा मार्ग अवलंबतात. अर्बन नक्षलवादाच्या नावावर विचार दाबण्याचे काम सध्याचे केंद्रातील व राज्यातील सरकार करीत आहे,हे कुणीही नाकारू शकत नाहीत.

### स्वप्नपूर्ती फाउंडेशनच्या वतीने शनिवारी मोती सन्मान आणि विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण

**लाखनी:–** स्वप्नपूर्ती फाउंडेशनच्या वतीने येत्या शनिवारी ५ एप्रिलला ङ्गमोती सन्मान आणि विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरणफ कार्यक्रम लाखनी येथे आयोजित करण्यात आला आहे. आमदार नानाभाऊ पटोले यांच्या हस्ते पुरस्कार आणि पारितोषिक प्रदान केले जाणार आहेत. याप्रसंगी खंडविकास अधिकारी धीरज पाटील ङ्ग२१ व्या शतकात असलेल्या संधी आणि त्यासाठी लागणारी कौशल्येफ यावर मार्गदर्शन करणार आहेत. सदर कार्यक्रमाला चेव्हनिंग शिष्यवृत्ती प्राप्त वकील दीपक चटक, जि. प. सदस्या डॉ. मनीषा निंबार्ते, उद्योजक अतुल भांडारकर, किशोर वाघाये, संजय वनवे यांची प्रमुख उपस्थिती असेल.

स्वप्नपूर्ती फाउंडेशनच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या गुणीजनांना मोती सन्मान देऊन गौरविण्यात येते तसेच वर्षभर विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. यंदा मूळचे भंडारा जिल्ह्यातील असलेले आणि सध्या स्पेन मध्ये वास्तव्यास असलेले लेखक व चित्रपट निर्माते रोशन रोशन भोंडेकर, प्रो कबड्डीसह विविध राष्ट्रीय स्पर्धांच्या माध्यमातून भंडारा जिल्ह्याचे नाव क्रीडाविश्वात नावारूपास आणणारे आकाश पिकलमुंडे आणि स्पर्धा परिक्षांच्या क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या विविध अडीअडचणींसाठी मार्गदर्शन करणारे, सामाजिक कार्यातही सक्रीय असलेले उमेश कोर्राम या ३ मान्यवरांना मोती सन्मान प्रदान केला जाणार आहे. तर छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त घेण्यात आलेल्या निबंध आणि चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण देखील याप्रसंगी पार पडणार आहे. स्वप्नपूर्ती फाउंडेशनचा आजवरचा प्रवास विशद करणारी एक चित्रफीत आणि स्वप्नपूर्ती फाउंडेशनसोबत काम करणाऱ्या युवकांनी सुरू केलेल्या एका डिजिटल प्लॅटफॉर्मचा लॉन्चिंग कार्यक्रम देखील यावेळी पार पडणार आहे. सदर कार्यक्रम लाखनी येथील स्वागत सभागृहात दुपारी ४ वा होणार आहे. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी, पालकांनी, नागरीकांनी आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन स्वप्नपूर्ती फाउंडेशनच्या वतीने अध्यक्ष प्रशांत वाघाये, सचिव सुधीर काळे, कार्यक्रम संयोजक आशिष राऊत, विशाल हटवार, लिखीत पुडके, अनिकेत नगरकर यांनी केले आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# सत्यशोधक चळवळीतील गावे आणि माणसे

सत्यशोधक चळवळीतील गावे आणि माणसे हा वऱ्हाडातील सत्यशोधक चळवळीचा इतिहास उलगडणारा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ सतीश माणिकराव जामोदकर यांनी लिहिला आहे. सुमारे दीडशे वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या सामाजिक क्रांतीचा शोध घेण्यासाठी लेखकाने वऱ्हाडातील अनेक गावे पालथी घातली. सत्यशोधक चळवळीत कार्यरत असलेल्या कार्यकर्त्यांच्या वंशजांशी चर्चा करून, ऐतिहासिक दस्तऐवजांचा अभ्यास करून आणि प्रत्यक्ष भेटींद्वारे त्यांनी हा मौलिक दस्तऐवज संकलित केला आहे.

**सत्यशोधक चळवळीची पार्श्वभूमी व उद्देश**

महात्मा ज्योतिराव फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुण्यात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या समाजाचा मुख्य उद्देश शूद्र–अतिशूद्र समाजावरील अन्याय–अत्याचार दूर करून त्यांना हक्कांची जाणीव करून देणे हा होता. ब्राह्मण्यवादी व्यवस्थेने निर्माण केलेला जातिभेद व वर्णभेद नष्ट करून समतेवर आधारित समाजव्यवस्था निर्माण करण्याचा सत्यशोधक समाजाचा प्रयत्न होता. या चळवळीने स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, सत्यशोधक विवाह, शेतीसंबंधी सुधारणा यांसारख्या क्षेत्रांत महत्त्वपूर्ण कार्य केले.

**वऱ्हाडातील सत्यशोधक चळवळीचा इतिहास**

या चळवळीचे वऱ्हाडात प्रचार–प्रसार करणारे अग्रणी कार्यकर्ते शास्त्री नारोबाबा (नारायण) महाघट पानसरे (साळुंखे) पाटील आणि धर्माजी रामजी डुंबरे पाटील हे होते. त्यांनी पायदळ प्रवास करत १९०० साली चांदूरबाजार तालुक्यातील करजगाव येथे सत्यशोधक समाजाची अधिकृत शाखा स्थापन केली. त्यानंतर, महात्मा फुले यांचे सहकारी आणि दीनबंधू मासिकाचे संपादक कृष्णराव पांडुरंग भालेकर यांनी वऱ्हाडातील गावोगावी सत्यशोधक विचार पोहोचवण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

या पुस्तकामध्ये सत्यशोधक चळवळीच्या प्रचारासाठी योगदान देणाऱ्या असंख्य ज्ञात–अज्ञात कार्यकर्त्यांचा शोध घेण्यात आला आहे. तत्कालीन कार्यकर्त्यांचे कार्य आणि योगदान समजण्यासाठी लेखकाने प्रत्यक्ष क्षेत्रभेटी घेतल्या, पारंपरिक आख्यायिका, पत्रव्यवहार, वर्तमानपत्रे आणि इतर ऐतिहासिक साधनांचा सखोल अभ्यास केला आहे.




**ग्रंथाचे वैशिष्ट्ये आणि रचना**

हा ग्रंथ केवळ ऐतिहासिक दस्तऐवज नसून, सत्यशोधक चळवळीतील गावे आणि कार्यकर्त्यांचे योगदान अधोरेखित करणारा समाजपरिवर्तनाच्या इतिहासाचा महत्त्वाचा स्रोत आहे. पुस्तकात ३० प्रकरणे असून, त्यातील प्रत्येक लेख सत्यशोधक चळवळीच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकतो. विदर्भातील सत्यशोधक विवाहांचा विशेष अभ्यास ग्रंथात समाविष्ट करण्यात आला आहे.

या ग्रंथाची आणखी एक महत्त्वाची वैशिष्ट्ये म्हणजे यात पुराव्यासाठी परिशिष्ट जोडण्यात आली आहेत. तत्कालीन कार्यकर्त्यांचे दुमिर्ळ छायाचित्रे, पत्रे आणि सत्यशोधक चळवळीच्या महत्त्वाच्या घटनांचे दस्तऐवजीकरण करण्यात आले आहे. पुस्तकाच्या मुखपृष्ठवर सत्यशोधक समाजाच्या झेंडा मिरवणुकीचा ऐतिहासिक फोटो प्रकाशित करण्यात आला आहे.

**सत्यशोधक समाजाचा प्रभाव आणि कालसुसंगतता**

सत्यशोधक समाजाने स्त्रियांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले. सावित्रीबाई फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या स्त्री विभागाचे नेतृत्व करून महिलांच्या सक्षमीकरणासाठी क्रांतिकारी कार्य केले. त्याचप्रमाणे, सत्यशोधक चळवळीने समाजातील शेतीप्रधान बहुजनांना त्यांच्या हक्कांबाबत जागृत केले.

आजही सामाजिक समतेच्या दृष्टीने सत्यशोधक चळवळीच्या विचारांची गरज आहे, असे लेखकाचे मत आहे. ब्राह्मणशाही, जातीभेद, आर्थिक विषमता आणि स्त्री–दलित अत्याचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी फुले–शाहू–आंबेडकरांच्या विचारधारेवर आधारित सामाजिक चळवळींची आवश्यकता भासत आहे.

ऐतिहासिक ठेवा असलेला हा महत्त्वपूर्ण ग्रंथ मेघा पब्लिशिंग हाऊस, अमरावती यांनी प्रकाशित केला आहे. या पुस्तकाची मजबूत बांधणी असून, त्यातील दस्तऐवजीकरण, ऐतिहासिक छायाचित्रे आणि पुराव्यांसह सत्यशोधक समाजाच्या कार्याचा आढावा घेतला आहे. पुस्तकाच्या मलपृष्ठवर लेखकाचा परिचय तसेच त्यांनी केलेल्या लेखनाची यादी देण्यात आली आहे. यावरून त्यांचा सामाजिक चळवळीतील अभ्यास आणि संशोधनाची बांधिलकी स्पष्ट होते. सत्यशोधक विचारांचा प्रभाव, वऱ्हाडातील परिवर्तनवादी नेतृत्व, आणि सत्यशोधक विवाह यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर लेखकाने आपले अभ्यासपूर्ण मत मांडले आहे. त्यामुळे सामाजिक इतिहास, संशोधन आणि परिवर्तनवादी विचारधारेबाबत रस असणाऱ्या वाचकांसाठी हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त ठरतो.

सत्यशोधक चळवळीतील गावे आणि माणसे हा ग्रंथ सत्यशोधक समाजाच्या कार्याचा ऐतिहासिक दस्तऐवज असून, तो संशोधकांसाठी आणि सामाजिक परिवर्तनासाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी तसेच समाजशास्त्र, इतिहास, आणि सामाजिक चळवळींबद्दल अभ्यास करणाऱ्या वाचकांसाठी मार्गदर्शक ठरू शकतो.

**तुळिशदास खिरोडकार**
**हिवरखेड, जि. अकोला**
**९९७०२७६५८२**

## "आशा दिवस" निमित्ताने आशा सेविका व गट प्रवर्तकांचा सत्कार



**गोरेगाव: –** राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रम अंतर्गत २७ मार्च रोजी गोरेगाव तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयामार्फत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे,जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक अर्चना वानखेडे यांच्या मार्गदर्शनात तालुका आरोग्य अधिकारी डॉ.विनोद चव्हाण यांच्या कल्पकेतून पंचायत समिती सभागृहात आशा दिवस समारंभ संपन्न झाला. कार्यक्रम उद्धाटक जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा आरोग्य व शिक्षण सभापती सुरेश हर्षे होते.अध्यक्षस्थानी पंचायत समिती सभापती चित्रलेखाताई चौधरी तर प्रमुख उपस्थिती अर्थ व बांधकाम सभापती डॉ.लक्ष्मणजी भगत,पंचायत समिती उपसभापती रामेश्वरजी महारवाडे,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे,गटविकास अधिकारी एच.व्ही.गौतम, गटशिक्षणाधिकारी एम.डी.पारधी व तालुका आरोग्य अधिकारी डॉ.विनोद चव्हाण उपस्थित होते.आशा सेविका यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणुन रांगोळी स्पर्धा,गायन स्पर्धा, तसेच समुह गान स्पर्धा यावेळी प्रस्तुत करण्यात आले.यावेळी गोरेगाव तालुक्यातील आशा सेविका व गट प्रवर्तकांचा सत्कार करण्यात आल्याची माहीती तालुका आरोग्य अधिकारी डॉ.विनोद चव्हाण यांनी दिली आहे.

यावेळी आरोग्य व शिक्षण सभापती सुरेशजी हर्षे यांनी आशा कार्यकर्त्यांमुळे लोकांना आरोग्य सेवा सोप्या आणि सहज उपलब्ध होतात, ज्यामुळे गरीब आणि दूरच्या भागातील लोकांनाही आरोग्य सुविधा मिळतात. आशा कार्यकर्त्यांच्या मदतीने लोकांना आरोग्य, स्वच्छता आणि कुटुंब नियोजन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांबद्दल माहिती मिळते आणि जागरूकता वाढत असल्याची माहीती दिली तर आशा कार्यकर्त्यांच्या मदतीने मातांना प्रसूतीपूर्व तपासणी, लसीकरण आणि स्तनपानाचे महत्त्व यांसारख्या बाबींची माहिती मिळते, ज्यामुळे माता आणि बालकांच्या आरोग्यात सुधारणा होते. आणी म्हणुनच आशा दिनी आपण आशा कार्यकर्त्यांच्या कार्याचा गौरव करतो आणि त्यांना प्रोत्साहन देत असल्याची माहीती डॉ.विनोद चव्हाण यांनी दिली.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी तालुका आरोग्य कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी मोलाची कामगिरी केली.

## उमेद अभियान ग्रामीण भागातील महिलांसाठी आर्थिक वरदान-लायकराम भेंडारकर

### उज्वल प्रभाग संघाचा महिला मेळावा उत्साहात

**अर्जुनी मोरगाव:–** आजची महिला अबला नसून सबला झाली आहे. घरातील चार भिंतींच्या बाहेर पडून महिलांनी विविध क्षेत्रात आपले असामान्य कर्तृत्व दाखवून नाव कोरले आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती उमेद अभियानामुळे ग्रामीण भागातील हजारो महिला संघटित होऊन एकत्र आल्या. विविध उपक्रमांत सहभागी होत असल्याने त्यांच्यामध्ये व्यावहारिक ज्ञानाची हातोटी आली. आर्थिक व्यवहार करण्याचे कसब महिला भगिनींनी आत्मसात केले. कुटुंबाची जबाबदारी सांभाळून उमेशच्या सहकार्याने स्वयंरोजगाराची काच धरल्याने आर्थिक पाठबळ प्राप्त झाले. उमेद अभियान ग्रामीण महिलांसाठी आर्थिक वरदान ठरत असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी केले.

तालुक्यातील माहूरकुडा येथील उज्वल प्रभाग संघाच्यावतीने वार्षिक मेळाव्याचे आयोजन शनिवारी करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी




जि.प.सदस्या कविता कापगते, पंचायत समिती सभापती आम्रपाली डोंगरवार, पंचायत समिती सदस्य शालिनी डोंगरवार, सरपंच लक्ष्मीकांत नाकाडे, उपसरपंच मिलिंद डोंगरे, प्रभाग संघाचे अध्यक्ष प्रवीण गायधने, सचिव शालिनी नाकाडे, योगेश्वरी चुटे, वनिता नागपुरे, इंदू नाकाडे, चंद्रकला यांनी, रत्नमाला राऊत उपस्थित होते.

भेंडारकर म्हणाले, आज महिला पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात कार्यरत आहेत. सामाजिक जीवनात महिलांना स्थान देणे गरजेचे आहे. शिक्षित महिला अख्ख्या कुटुंबाला सावरण्याचे काम करून घरामध्ये नंदनवन फुलविण्याचे अप्रतिम कार्य आजची महिला भगिनीच करू शकते. उमेद अभियानाच्या माध्यमातून महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. कुशल संघटन कौशल्य महिलांमध्ये असल्याने संघटनात्मक उद्योग करत सर्वांगीण प्रगती साधून आर्थिक सक्षम बनावे, असे त्यांनी याप्रसंगी सांगितले. यावेळी अन्य मान्यवरांनीसुद्धा मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभाग समन्वयक प्रवीण रामटेके यांनी मांडले. संचालन कविता चव्हाण यांनी केले, तर प्रभाग संघाच्या लेखापाल उषा नाईक यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. उपस्थितांचे आभार तुलसीदास भंडारी यांनी मानले.

# "उष्णतेची लाट:आरोग्याची योग्य काळजी घेणे गरजेचे"

उष्णतेची लाट (heat wave) म्हणजे वातावरणातील तापमान अचानक आणि मोठ्या प्रमाणावर वाढणे, जी काही दिवसांसाठी टिकून राहते. ही एक नैसर्गिक हवामान घटना आहे, जी हवामान बदलामुळे अधिक तीव्र आणि वारंवार होत आहे.

उष्णतेच्या लाटा एखाद्या व्यक्तीच्या आरोग्यासाठी धोकादायक असू शकतात, विशेषतः ज्यांना अतिसंवेदनशीलता आहे जसे की मुले, वृद्ध लोक, गर्भवती महिला आणि आधीच आरोग्य समस्या असलेल्या व्यक्तींसाठी. उष्णतेच्या लाटेदरम्यान उच्च तापमानामुळे उष्णतेशी संबंधित आजार जसे की उष्माघात होतो. या परिस्थितीमुळे निर्जलीकरण, इलेक्ट्रोलाइट असंतुलन आणि इतर गुंतागुंत होऊ शकतात, ज्यावर त्वरित उपचार न केल्यास ते धोकादायक ठरू शकतात.

उष्णतेच्या लाटेत स्वतःचे संरक्षण करण्यासाठी, हायड्रेटेड राहणे, जास्त काळ उन्हात राहू नये, हलक्या रंगाचे आणि सैल कपडे घालणे आणि शक्य असेल तेव्हा वातानुकूलित वातावरणात राहणे अत्यंत आवश्यक आहे. वृद्ध किंवा दीर्घकालीन आजार असलेल्या असुरक्षित व्यक्तींची आरोग्य तपासणी करणे देखील आवश्यक आहे .

**उष्णतेच्या लाटेची लक्षणे**

जास्त थकवा येणे, अशक्तपणा वाटणे, डोकेदुखी, डोळे दुखणे, शरीराचे तापमान १०४ फॅरनहाईट (४० डिग्री सेल्सिअस) पेक्षा जास्त वाढणे, चक्कर येणे, डोळे फिरणे, त्वचेला कोरडेपणा येणे, मळमळणे आणि उलटी होणे, हृदयाचे ठोके वाढणे, धडधडणे, तहान लागणे, तोंड आणि घसा कोरडा पडणे, लघवीचे प्रमाण कमी होणे आणि गडद पिवळी लघवी होणे, जास्त घाम येणे, अशक्तपणा वाटणे, चक्कर येणे, मळमळ किंवा उलट्या होणे, डोकेदुखी आणि स्नायू पेटके येणे, शरीराचे उच्च तापमान (१०३F$ किंवा ३९.४F$ पेक्षा जास्त), घाम नसलेली गरम, कोरडी त्वचा ,जलद नाडी, श्वास घेण्यास त्रास होणे, गोंधळ, झटके आणि बेशुद्धी, शरीराच्या ज्या भागात उष्णता आणि घामाचा संपर्क येतो जसे की मान, छाती, मांडीचा सांधा आणि कोपराच्या वरच्या भागात त्वचेची जळजळ होणे, उष्ण हवामानात तीव्र शारीरिक हालचाली दरम्यान किंवा नंतर येऊ शकणारे वेदनादायक स्नायू पेटके येणे, चक्कर येणे, डोके हलके होणे किंवा अशक्तपणा जाणवणे आणि डिहायड्रेशन, उष्माघात किंवा उष्माघातामुळे बेशुद्ध होण्याची शक्यता असते.

**उष्णतेच्या लाटेत काय करावे ?**

भरपूर पाणी प्या, जेणेकरून शरीरात पाण्याची कमतरता (वशहूवीरींळेप) होणार नाही, उन्हात जास्त वेळ राहू नका, सावलीत रहा, सैल आणि हलके कपडे घाला, थंड पाण्याने आंघोळ करा किंवा थंड पाण्याने शरीर पुसा, लिंबू पाणी, ताक, लस्सी, ओआरएस (ORS) यांसारखी थंड पेये प्या, गरम पदार्थ, चहा, कॉफी टाळा, जास्त शारीरिक व्यायाम करणे टाळा, उष्माघाताची लक्षणे दिसल्यास लगेच डॉक्टरांना संपर्क साधा.

**उष्णतेच्या लाटेत काय करू नये?**



उन्हात जास्त वेळ फिरू नका, जड कपडे घालू नका, गरम पेये टाळा, जास्त शारीरिक व्यायाम करणे टाळा, अल्कोहोल, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड पेये टाळा.

**उष्माघात कसा ओळखावा ?**

उष्माघातात प्रौढांमध्ये शरीराचे तापमान १०४ फॅरनहाईटपर्यंत (४० डिग्री सेल्सिअस) पोहोचल्यास, तीव्र डोकेदुखी, मळमळणे, उलटीचा भास होणे, चिंता वाटणे व चक्कर येणे, हृदयाचे ठोके वाढणे, धडधडणे ही लक्षणे दिसतात. उष्णतेच्या लाटेमुळे थकवा तसेच सतत झोप येणे ही लक्षणे सुद्धा असतात.

लहान मुलांनी आहार घेण्यास नकार देणे किंवा चिडचिड होणे, लघवीचे कमी झालेले प्रमाण, शुष्क डोळे, तोंडाची त्वचा कोरडी होणे अशी लक्षणे दिसत असतील तर त्यांना उष्माघात झाला असू शकतो. उष्णतेची लाट येते तेव्हा उष्माघात होण्याचे प्रमाण वाढते. उष्णतेच्या लाटेमुळे थकवा, सतत झोप येणे ही लक्षणे आढळून येतात.

कडाक्याच्या उन्हात काम केल्याने किंवा शरीरात उष्णता निर्माण झाल्याने खूप गंभीर त्रास होतो, त्याला उष्माघात म्हणजेच सनस्ट्रोक किंवा हिटस्ट्रोक असेही म्हटले जाते.

**उष्णतेची लाट म्हणजे काय ?**

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार समुद्र किनाऱ्याजवळच्या प्रदेशात सलग दोन दिवस ३७ अंश सेल्सियसपेक्षा जास्त कमाल तापमान नोंदवले गेले किंवा सलग दोन दिवस तापमानात नेहमीपेक्षा ४.५ अंशांहून अधिक वाढ झाली, तर उष्णतेची लाट आल्याचे मानले जाते.

कमाल तापमानातील वाढ ६.५ अंश सेल्सियसपेक्षा जास्त असेल तर त्याला अतिउष्ण लाट किंवा सिव्हीयर हीट वेव्ह (Severe Heat wave) म्हटले जाते.

उष्णतेच्या लाटांचे आर्थिक परिणाम देखील होतात, जसे की थंडीसाठी वाढलेली ऊर्जेची मागणी, पीक उत्पादनात घट आणि कामगार उत्पादकता कमी होणे. हवामान बदलामुळे, विशेषतः ग्रीनहाऊस वायूंचे (greenhouse gases) वाढते प्रमाण, उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र आणि वारंवार होत आहेत.

हवामान बदलामुळे जगाच्या अनेक भागांमध्ये उष्णतेच्या लाटांची वारंवारता आणि व्याप्ती वाढण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे त्यांचा प्रभाव कमी करण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**एखाद्या व्यक्तीला उष्माघात झाल्यास काय करावे ?**

उष्णतेची लाट पाहता आवश्यक नसल्यास दुपारच्या वेळेत बाहेर पडणे टाळावे. लोकांनी घाबरू नये, पण काळजी घ्यावी असे हवामान विभागाच्या वतीने सांगण्यात येते.

दर तीन ते चार तासाने लघवीला जाणे आवश्यक आहे, त्यासाठी तेवढे पाणीही शरीरात जायला हवे. लघवीचा रंग गडद पिवळा असल्यास शरीरात पाण्याची कमतरता आहे असे समजावे.

**याप्रमाणे घ्यावी काळजी :**

तात्काळ डॉक्टरांशी संपर्क साधावा.दरम्यानच्या काळात त्याला थंड सावलीच्या ठिकाणी झोपवावे.ओल्या कपड्याने त्याचे शरीर पुसून घ्यावे.त्याच्या डोक्यावर साधे पाणी टाकत राहावे.एकंदरीत त्याच्या शरीराचे तापमान कमी करण्याचा प्रयत्न करावा. त्या व्यक्तीला जठड किंवा लिंबू सरबत द्यावा.त्या व्यक्तीला जवळच्या डॉक्टरकडे ताबडतोब घेवून जावे. उष्णतेच्या लाटाचे काय परिणाम होतात ?

**उष्णतेशी संबंधित आजार :** उष्णतेच्या लाटांचा सर्वात सामान्य आणि थेट परिणाम म्हणजे उष्णतेशी संबंधित समस्यांचा धोका वाढतो, जसे की उष्माघात. या परिस्थितीमुळे निर्जलीकरण, बेशुद्धी आणि काही प्रकरणांमध्ये अवयवांचे नुकसान किंवा कधीकधी मृत्यू देखील होऊ शकतो.

हवेची गुणवत्ता : उष्णतेच्या लाटा जमिनीवरील ओझोन आणि कण युक्त पदार्थांसारख्या प्रदूषकांचे प्रमाण वाढवून हवेची गुणवत्ता खराब करू शकतात. यामुळे श्वसनाच्या समस्या उदभ्वू शकतात, विशेषतः दमा किंवा सीओपीडी सारख्या पूर्व–अस्तित्वात आजार असलेल्या लोकांमध्ये आढळून येतात.

पाण्याची गुणवत्ता : उष्णतेच्या लाटेत शरीराचे तापमान वाढू शकते ज्यामुळे हानिकारक शैवाल आणि जीवाणूंची वाढ होऊ शकते. याचा परिणाम पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षिततेवर होऊ शकतो.

शेती : उष्णतेच्या लाटांचा पिकांच्या उत्पादनावर आणि अन्न उत्पादनावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. उच्च तापमानामुळे पिकांचे नुकसान होऊ शकते आणि जमिनीतील ओलावा कमी होऊ शकतो, ज्यामुळे दुष्काळाची परिस्थिती निर्माण होते.

पायाभूत सुविधा : उष्णतेच्या लाटांमुळे पॉवर ग्रीड आणि वाहतूक प्रणालीसारख्या पायाभूत सुविधांवर ताण येऊ शकतो. एअर कंडिशनिंग सिस्टमला वीज पुरवण्यासाठी विजेची वाढती मागणी पॉवर ग्रिडवर ताण आणू शकते आणि ब्लॅकआउट होऊ शकते.

उष्णतेच्या लाटांची कारणे समजून घेऊन आपण या घटनांचा चांगल्या प्रकारे अंदाज लावू शकतो आणि मानवी आरोग्यावर परिणाम कमी करू शकतो. उष्णतेच्या लाटा गांभीर्याने घेणे आणि या तीव्र हवामान घटनांमध्ये सुरक्षित आणि निरोगी राहण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, गोंदिया**

# मलकाझरी परिसरात कुजलेल्या अवस्थेत आढळला वाघाचा मृतदेह

## पाच सहा दिवसांपुर्वी मृत्यू झाल्याचा अंदाज



**देवरी:-** तालुक्यातील चिचगड वनक्षेत्रातंर्गत येणाऱ्या मलकाझरी कक्ष क्रमांक ८०२ मध्ये कुजलेल्या अवस्थेत वाघाचा मृतदेह आढळल्याची घटना शुक्रवारी (दि.२८) दुपारच्या सुमारास उघडकीस आली.वाघाचा मृतदेह पुर्णपणे कुजलेल्या असल्याने त्याचा पाच सहा दिवसांपुर्वी मृत्यू झाल्याचा अंदाज वन्यजीव विभागाच्या अधिकाऱ्यांनी वर्तविला आहे.

चिचगड वनक्षेत्रातंर्गत येणाऱ्या मलकाझरी कक्ष क्रमांक ८०२ परिसरात वनरक्षक शुक्रवारी दुपारी गस्त घालत असताना एका पाणवठ्याजवळ कुजलेल्या अवस्थेत वाघाचा मृतदेह आढळला. त्यांनी लगेच याची माहिती वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक प्रमोद पंचभाई यांना व वन अधिकाऱ्यांना दिली. माहिती मिळताच उपवनसंरक्षक प्रमोद पंचभाई हे कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी पोहचले. त्यांनी घटनास्थळी पोहचून पाहणी केली.

वाघाचा मृतदेह हा पुर्णपणे कुजलेल्या होता. त्याच्या गळ्याजवळ काही खूणा आढळल्या. तसेच या वाघाला मारल्यानंतर त्याला पाचशे मीटरपर्यंत फरफटत पाणवठ्याजवळ नेण्यात आल्याची बाब परिसरातील खूणावरुन पुढे आली. एकंदरीत दोन वाघांच्या झुंझीमध्येच या वाघाचा मृत्यू झाला असावा असा अंदाज वन्यजीव विभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. या वाघाचा मृत्यू पाच सहा दिवसांपुर्वी झाला असल्याचे मृतदेहाच्या स्थितीवरुन आढळले. विशेष म्हणजे मृतदेह पुर्णपणे कुजलेला असल्याने त्याचे शवविच्छेदन सुध्दा करता आले नाही अथवा नमुने सुध्दा तपासणीसाठी घेता आले नसल्याचे वृत्त आहे.

### ट्रॅप कमेऱ्यांची मदत घेणार

**ज्या ठिकाणी वाघाचा मृतदेह आढळला त्या परिसरात एखाद्या वाघाचा वावर असण्याची शक्यता आहे. त्याच वाघासह झालेल्या झुंझीत वाघाचा मृत्यू झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मलकाझरी कक्ष क्रमांक ८०२ मध्ये ट्रॉप कॅमेरे लावले असून त्यांची तपासणी करुन या वाघाचा नेमका मृत्यू कशामुळे झाला याचा शोध घेण्यात येणार असल्याचे वन्यजीव विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.**

# जलजिवनच्या मुद्यावर माजी अध्यक्ष धावले ईई बेलपात्रेच्या मदतीला

**गोंदिया:-** जिल्हा परिषदेच्या नव्या पदाधिकार्यांच्या कार्यकाळातील पहिल्याच सर्वसाधारण सभेत माजी बांधकाम सभापतीने जलजिवन मिशनच्या कामाना घेत अनियमितता व निकृष्ठ कामे होत असल्याचा आरोप केल्याने खळबळ माजली. सत्तेत पदावर असताना बांधकाम सभापतीनी मात्र जलजिवन मिशनच्या कामावर चुप्पी साधली होती, मात्र पदावरुन पायउतार होताच सर्वसामान्य सदस्यासारंखे प्रश्न उपस्थित करुन ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्याना धारेवर धरले.जलजिवन मिशनच्या कामात कुठलीच अनियमितता नाही,व्यवस्थित होत असून लहानमोठ्या वृत्तपत्राच्या पत्रकारांनी उपस्थित केलेल्या गोष्टीकडे लक्ष द्यायची गरज नाही,जलजिवन मिशनची कामे चांगली सुरु असल्याचे सांगत माजी जि.प.अध्यक्षांनी आपल्याच पक्षाच्या सदस्याचे प्रश्न खोडत काढत कार्यकारी अभियंता बेलपात्रे यांची बाजू घेतल्याने जिल्हा परिषदेच्या वतुर्ळात नव्या चर्चांना उधाण आले आहे.



विशेष म्हणजे जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्या अध्यक्षतेखाली जि.प.सभागृहात २८ मार्च रोजी पार पडली.यासभेला जि.प.उपाध्यक्ष सुरेश हर्षे, मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगांथम , महिला बालकल्याण सभापती पौर्णीमा ढेंगे, अर्थ व बांधकाम सभापती डॉ.लक्ष्मण भगत, समाजकल्याण सभापती रजनी कुंभरे, कृषी व पशुसंवर्धन सभापती दिपा चंद्रिकापूरे उपस्थित होते.सभेला सुरवात होताच जि.प.सदस्य संजय टेंभरे यांनी जलजिवन मिशनच्या कामावर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याने ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुमित बेलपात्रे उभे होऊन जि.प.अध्यक्ष यांना उद्देशून मा.अध्यक्ष सदस्यांना गप्प करावे असे बोलल्याचे सुत्रांनी सांगितले. सभागृहातील जि.प.सदस्य हे मान्यवर असून सदस्यांना गप्प व शांत करावे असा एकेरी उल्लेख करुन कार्यकारी अभियंत्यानी सभागृहातील प्रश्न उपस्थित करणार्या सदस्याचाच नव्हे तर सभागृहातील सर्वच सदस्याचा अवमान केल्याची चर्चा सुरु झाली आहे.जलजिवन मिशनच्या कामात अनियमिततेच्या बातम्या अनेक वृत्तपत्रांनी प्रकाशित करुन शासनाचे लक्ष वेधण्याचे काम केले होते.मात्र माजी जि.प.अध्यक्ष पकंज रहागंडाले यांनी कार्यकारी अभियंत्याची बाजू घेतांना वृत्तपत्र व पत्रकारांना महत्व देण्याचे गरज नसल्याचे बोलल्याची चर्चा आहे.

# गोंदियात डॉ. आंबेडकर जयंतीची जय्यत तय्यारी; प्रा. महेश प्रसाद अहिरवार आणि पत्रकार निरंजन टकले येणार

**गोंदिया :-** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंतीसाठी गोंदियात जय्यत तय्यारी सुरु झाली आहे. १४ आणि १५ एप्रिल रोजी आयोजित या दोन दिवशीय कार्यक्रमा दरम्यान विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. दरम्यान १४ एप्रिल रोजी आयोजित मुख्य कार्यक्रमात उत्तर प्रदेश च्या बनारस हिंदू युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर महेश प्रसाद अहिरवार मुख्यवक्ता म्हणून मार्गदर्शन करणार आहेत.तर १५ एप्रिल रोजी आयोजित कॅडर कॅम्प मध्ये ज्येष्ठ पत्रकार निरंजन टकले मार्गदर्शन करणार आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्व. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अनंत कुमार टेम्भूरकर यांनी दिलेल्या माहिती नुसार जयंतीच्या कार्यक्रमासाठी कार्यकर्ते कामाला लागले असून हा कार्यक्रम नगरपरिषद सुभाष शाळेच्या पटांगनावर होणार आहे.१३ एप्रिलच्या मध्यरात्री फटाक्याच्या



लड्या फोडून अतिशबाजी करण्यात येईल. त्यांनतर सकाळी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन करून जयंतीच्या मुख्य कार्यक्रमाला सुरुवात होईल. शहरातील प्रत्येक भागातून रॅली काढण्यात येणार असून फुले शाहू आंबेडकरी विचारधारेवर देखाव्यांचे प्रदर्शन घडविण्यात येणार आहे. याप्रसंगी विविध समाजातील सामाजिक कार्यकर्त्यांचा स्मृती चिन्ह देऊन सत्कार करण्यात येईल. फुले शाहू आंबेडकरी विचारधारेवर आधारित छत्तीसगड येथील जागृती जत्था द्वारा प्रस्तुत भीमगीतांची मैफल, तसेच प्रा. अहिरवार या मुख्य वक्त्यांचे प्रबोधन होणार आहे.

दुसऱ्या दिवशी ता.१५ रोजी विद्यार्थ्यांची गुणवत्ता परीक्षा, प्रसिद्ध विचारवंत व पत्रकार निरंजन टकले यांचे कॅडर कॅम्प, बुद्धिमान अधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांना कॉम्पिटिशन परीक्षेचे मार्गदर्शन होणार आहे. दरम्यान रात्री मनोरंजनपर कार्यक्रमांतर्गत मुंबई येथील प्रसिद्ध गायक आणि लोक कवी वामनदादा कर्डक यांचे नातजावई अविनाश नाईक यांचा ऑर्केस्ट्रा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जयंती समितीचे अध्यक्ष अनंत टेम्भूरकर,उपाध्यक्ष अशोक कांबळे, महासचिव अरविंद भावे, कोकिळा राहुलकर,विलास वासनिक, अरविंद साखरे,नानाजी शेंडे, सविता उके, डॉ राजेश उके, सुनील डोंगरे, सुनील मेश्राम, संजय वाहाणे, मच्छिन्द्र भेलावे,संतोष श्यामकुवर, मनिषा गजभिये, ऍड अंजली चौरे, निशा मेश्राम, पृथ्वीराज कोल्हटकर यांनी केले आहे.

# गोंदियात बाईक रॅलीचे आयोजन ११ एप्रिल रोजी

**गोंदिया :-** सामाजिक क्रांतीचे जनक, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९८ व्या जयंती निमित्त शुक्रवारी ११ एप्रिल रोजी अभिवादन करण्यात येणार असून या प्रसंगी गोंदियात बाईक रॅलीचे आयोजन करण्यात येणार आहे.



डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्व. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अनंत टेम्भूरकर आणि मरार समाज कल्याण समितीचे अध्यक्ष आत्माराम पाचे यांनी संयुक्त बयान जारी करून म्हंटले आहे की,या बाईक रॅलीचे आयोजन सकाळी ११वाजता दरम्यान भीमनगर इथून प्रस्थान होइल. दरम्यान गोंदिया शहरातून भ्रमण करून या रॅलीचा समारोप मरार समाज भवन बापू नगर मरारटोली येथे होणार आहे. महात्मा फुल्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी गुरु मानलं, ते थोर समाज सुधारक होते.मुलींसाठी पाहिली शाळा उघडून स्त्री शिक्षणाचे पुरस्करते, जातीव्यवस्था निमूर्लन, लेखक, थोर विचारवंत अश्या महामानवाना अभिवादन करण्यासाठी मोठ्यासंख्याने रॅलीत सहभागी होण्याचे आवाहन मरार समाज कल्याण समितीचे अध्यक्ष श्री पाचे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्व. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष श्री टेम्भूरकर यांनी केले आहे.

# लोडशेडिंग बंद न केल्यास आंदोलन-सुरेश हर्षे

**आमगाव :-** झिलमिली वीज उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या गावांत अघोषित भारनियमन सुरू करण्यात आले आहे. तत्काळ भारनियमन बंद करण्यात यावे अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुरेश हर्षे यांनी दिला आहे. वीज उपकेंद्र झिलमिली (कामठा) अंतर्गत आमगाव तहसील अंतर्गत बोदा, टाकरी, गिरोला, मोहरंटोला, आणि घट्टेमणी या गावातील ग्रामीण भागातील लोकांना व शेतकऱ्यांना वीज पुरवठा केला जातो. मात्र दिवसातून ३ ते ४ तास वीज खंडित होत असल्याने शेतकऱ्यांनी लागवड केलेले रब्बी पीक उद्ध्वस्त झाले आहे. याचा नागरिकांच्या व्यवसायावरही मोठा परिणाम झाला आहे.



गोंदिया जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुरेश हर्षे यांनी महाराष्ट्र वीज वितरण कंपनीचे शाखा अभियंता झिलमिली यांना पत्र देऊन बोदा, टाकरी, गिरोला, मोहरानटोला, बनियाटोला व घाटटेमणी गावांचे लोडशेडिंग तत्काळ बंद करा. अन्यथा, महावितरणच्या कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला. त्यासंदर्भात त्यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता आणि तहसीलदार, ठाणेदार यांना पत्र दिले.

# महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणूक कार्यक्रम घोषित ३ एप्रिल रोजी मतदान

**गोंदिया :** महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणूक २०२५ चा निवडणूक कार्यक्रम घोषित झाला असून गुरुवार दिनांक ३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८ वाजेपासून ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान घेण्यात येणार आहे. गोंदिया जिल्ह्यातील ६२८ मतदार परिषदेकडे नोंदणीकृत आधुनिक वैद्यक शास्त्रातील व्यावसायिक (डॉक्टर्स) यांना आपल्या मतदानाचा हक्क बजावण्यासाठी अधिष्ठाता यांच्या कक्षाच्या बाजुची रुम, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया येथे मतदान केंद्र स्थापन करण्यात आले आहे.

# मुरुमाऐवजी मलब्याचा वापरून केले जातेय कालव्याचे काम

## बोदलकसा डाव्या कालव्याचे काम : कंत्राटदाराचे मनमानी धोरण, कारवाईची मागणी



**सुकडी डाकराम :-** तिरोडा तालुक्यातील बोदलकासा जलाशयाच्या डाव्या कालव्याचे बांधकाम सुरू असून, याकडे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. याचाच फायदा घेत कंत्राटदार कालव्याच्या कामाकरिता मुरुमाचा वापर करण्याऐवजी मलब्याचा वापर असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. त्यामुळे या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्न चिन्ह निर्माण झाले असून, या बांधकामाची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली.

प्राप्त माहितीनुसार धापेवाडा उपसा सिंचन योजनेचे पाणी बोदलकसा व चोरखमारा जलाशयात सोडले जात आहे. या कालव्याच्या माध्यमातून पाणी शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिले जाते. बोदलकासा व चोरखमारा जलाशयाचे पाणी वाहून नेण्यासाठी डाव्या कालव्याची दुरुस्ती केली जात आहे. यासाठी शासनाने कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर केला. उजव्या व डाव्या कालव्याचे सिमेंट क्राँक्रीटने दोन्ही कालवे तयार करून शेतकऱ्यांना धान पिकांना पाणी देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

कालव्याचे दुरुस्तीचे काम नागपूर येथील एका कंत्राटदाराला दिले आहे. या कामावर नियंत्रण ठेवण्याची जवाबदारी धापेवाडा उपसा सिंचन विभागाची आहे. यासाठी सहायक कनिष्ठ अभियंता देशमुख यांच्याकडे जवाबदारी सोपविण्यात आली.

मात्र, संबंधित विभागाचे या कामाकडे दुर्लक्ष झाल्याने कंत्राटदार आपल्या मनमर्जीने काम करीत असून, मुरुमाएेवजी मलब्याचा वापर करीत असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. त्यामुळे डावा कालवा दुरुस्तीच्या कामावर प्रश्न चिन्ह निर्माण झाला आहे.

### सूचनेनंतरही मलब्याचा वापर सुरू

**बोदलकसा जलाशयाच्या डाव्या कालव्याच्या बांधकामात संबंधित विभागाच्या सूचनेनंतरही मुरुमाऐवजी मलब्याचा वापर केला जात आहे. त्यामुळे संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची दखल घेऊन कंत्राटदारावर कारवाई करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.**

### कंत्राटदाराला मुरुमाचा वापर करण्याच्या सूचना

**यासंदर्भात सहायक अभियंता देशमुख यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी कालव्याच्या कामात मुरुमाचाच वापर करण्याच्या सूचना कंत्राटदार व कामावरील सुपरवायजर यांना केल्या आहेत. तसेच यापुढे असा प्रकार आढळल्यास कारवाई केली जाईल, असे सांगितले.**

# अंनिसचे जादूटोणा विरोधी कायदा व चमत्कार प्रशिक्षण



**गोंदिया :-** समता सैनिक दल व भारतीय बौद्ध महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय महिला व विद्यार्थी प्रशिक्षण शिबिरात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडून चमत्कार सादरीकरण व जादूटोणा विरोधी कायद्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

मैत्रेय बौद्ध विहार येथे आयोजित तीन दिवसीय निवासी शिबिराला जिल्ह्यातील ग्रामीण परिसरातून प्रशिक्षणासाठी विद्यार्थी व महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अध्यक्षस्थानी समता सैनिक दलचे राष्ट्रीय अध्यक्ष डी. एफ. कोचे होते. याप्रसंगी समता सैनिक दलचे गजेंद्र गजभिये, आर. सी. फुल्लुके, महाअंनिस शाखेचे प्रधान सचिव विनोद बंसोड, कार्याध्यक्ष अनिल गोंडाने प्रामुख्याने उपस्थित होते. संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन जिल्हा निधी संकलन कार्यवाह चंद्रशेखर मेश्राम यांनी केले, तर चळवळीचे गीत सादर करून उत्तर नागपूरचे कार्याध्यक्ष देवानंद बडगे यांनी कार्यक्रमात रंगत आणली. राज्य कार्यकारिणी सदस्य राम डोंगरे यांनी महाअंनिसचे कार्य व उद्देश काय हे प्रस्तावनेत सादर केले. तसेच देवानंद बडगे यांना सोबत घेऊन चमत्काराचे विविध प्रयोग ज्यात पाण्याने दिवा जाळणे, पैशांचा पाऊस पाडणे, दोरखंड कापून जसेच्यातसे जोडणे, लोखंडी लंगर सोडविणे, मंत्राने हवन जाळणे आदी प्रमुख चमत्कार सादर करून विद्यार्थी व महिलांना मंत्रमुग्ध केले.

संचालन नागपूर जिल्हा कार्याध्यक्ष चित्तरंजन चौरे यांनी केले. आभार समता सैनिक दलच्या म. प्र. राज्याचे प्रमुख कुंवरलाल रामटेके यांनी मानले. शिबिराला रंजना वालदे, प्रेमलता राऊत, शिवमाला महामे, किरण वासनिक, ज्योती बोरकर, शशिकला वैद्य, चित्रा मेश्राम, वंदना चौरे, छाया मेश्राम, तक्षशिला गडपायले, संध्या रामटेके, केशर डहाट, शोभा वैद्य, लता वासनिक, सुनीता रंगारी, मंदा बनसोड, लक्ष्मी राऊत, अंशुल राऊत, स्वप्निल गणवीर, विलास राऊत यांच्यासह विद्यार्थी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# ककोडी परिसरात बीएसएनएलची सेवा कुचकामी

## नॉटरिचेबलच्या समस्येने ग्राहक त्रस्त

**देवरी:-** तालुक्यातील ककोडी परिसरात मागील दोन महिन्यांपासून बीएसएनएलची सेवा कुचकामी ठरली आहे. सेवा बंद असल्याने ग्राहकांना चांगलाच फटका बसत आहे. नेटवर्क समस्येने आधीच त्रस्त असलेले ग्राहक सेवा बंद पडल्याने संतापले आहेत. यामुळे बीएसएनएल कंपनीच्या कार्यप्रणालीवर रोष व्यक्त केला जात आहे. सेवा बंद असूनही कंपनीचे अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून कसलीही उपाययोजना केली जात नाही. यामुळे ग्राहकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

दुरसंचार क्षेत्रात क्रांती घडून आली. अनेक खासगी कंपन्यांचा उदय झाला. त्यांनी ग्राहकांच्या मोठा वर्ग आपल्याकडे खेचला. परंतु, भारतीय संचाय निगम (बीएसएनएल) या कंपनीवर ग्राहकांचा आजही विश्वास आहे. परंतु, ग्राहकांच्या विश्वासाला तडा देण्याचे काम कंपनीकडून केले जात आहे. देवरी तालुक्यातील ककोडी येथे मागील दोन महिन्यांपासून बीएसएनएलची सेवा बंद पडली आहे.

सेवा बंद असूनही कर्मचारी, अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे. यामुळे ग्राहक, विद्यार्थ्यांना मोठा फटका बसला आहे. तर दैनंदिन कामकाज प्रभावित होवून नुकसानीचा समोर जावे लागत आहे. नक्षलग्रस्त क्षेत्र असून या ठिकाणी टॉवर उभारण्यात आले आहेत. मात्र हे टॉवर आजघडीला शोभेची वास्तु ठरले आहेत. तर सेवा मिळत नसल्याने ग्राहकही संतापले आहेत.

### तक्रार करूनही दुर्लक्ष

**बीएसएनएलची सेवा विस्कळीत झाली आहे. त्यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या समस्येला घेवून नागरिकांनी जनप्रतिनिधी व बीएसएनएलच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना तक्रार केली. तक्रारीनुसार संबंधीत अधिकारी येऊन एक दोन दिवसाकरिता दुरुस्ती करून जातात. नंतरची स्थिती मात्र जैसे थे ! होते. याकडे जाणून दुर्लक्ष केले जात असून खासगी कंपन्यांना फायदा पोहोचविण्यासाठीच असे केले जात आहे, असा आरोप गावकरी करीत आहेत.**

### सेवा देण्यात बीएसएलएल माघारली





आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात नवनवीन तंत्रज्ञानाचा शोध घेतला जात आहे. दूरसंचार सेवेच्या बाबतीतही मोठी प्रगती झाल्याचे पहावयास मिळत आहे. दूरसंचार क्षेत्रातील खासगी कंपन्यांनी सेवा ही ग्राहकांना अनेक आमिष देवून आपल्याकडे खेचत आहेत. तर सरकारी मत्तेदारी असलेली बीएसएनएल ही कंपनी मात्र माघारत चालली आहे. सेवेच्या बाबतीत काही न सांगणेच बरे ! मागील अनेक वर्षांपासून ग्राहकांनी विश्वास ठेवून बीएसएनएलची सेवेचा उपभोगणे सुरूच ठेवले. मात्र काळात बीएसएनएलच्या सेवेत कसलाही बदल न होता उलट सेवा डोकेदुखीची ठरू लागली आहे. याचा प्रत्यय ग्रामीण भागातील नागरिकांना वेळोवेळी येते. इतर कंपन्या ५-जी सेवा देत आहेत. परंतु, बीएसएनएल कंपनीकडून साधी ३-जी सेवा दिली जात नाही.

# जिल्हा बँक निवडणूक हालचालींना आला वेग

**गोंदिया :-** गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूक प्रक्रियेला वेग आला आहे. काही तांत्रिक अडचणीमुळे गेल्या १३ वर्षांपासून रखडली होती. पण उच्च न्यायालयाने सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत जिल्हा बँकेची निवडणूक घेण्याचे आदेश दिले. त्यानंतर आता निवडणूक हालचालींना वेग आला आहे. तर या निवडणुकीसाठी राजकीय पक्षांनीसुद्धा मोर्चे बांधणीला सुरुवात केल्याचे चित्र आहे.



जिल्ह्यातील सहकार क्षेत्रावर मजबूत पकड ठेवण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर सत्ता असणे आहे. तसेच राजकीयदृष्ट्यासुद्धा महत्त्व आहे. त्यामुळेच सर्व प्रमुख राजकीय पक्षांनी या निवडणुकीसाठी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. एकूण २० संचालकपदासाठी ही निवडणूक होणार असून यासाठी जवळपास १२५० मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. न्यायालयाच्या निणर्यानंतर सहकार निबंधक विभागाने निवडणूक प्रक्रियेला सुरुवात केली आहे. ११ एप्रिलला प्रारूप मतदार याद्या संबंधित विभागाकडे सादर केल्या जाणार आहेत. त्यानंतर महिनाभराच्या कालावधीत या निवडणुका होण्याची शक्यता आहे. त्यासाठी हालचालींना आता वेग आला आहे. तर राजकीय पक्षांनी यासाठी सभा बैठकांचे सत्र सुरु केले असून संचालक पदासाठी चेहरे निश्चित करीत असल्याचे चित्र सध्या जिल्ह्यात आहे.

# दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती राज्यस्तरीय स्पर्धा थाटात

**गोंदिया :-** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन द्वारे सन २०२३ मध्ये शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेचे राज्यस्तरीय आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे जिल्हास्तरीय बक्षीस वितरण समारंभ आज दिनांक २९ मार्चला श्री गुरुनानक स्कूल चे वातानुकूलित सभागृहात मोठ्या थाटात संपन्न झाले. या समारंभात जिल्ह्यातील एकूण ७५ शिक्षकांना जिल्हास्तरीय पारितोषिकांनी सन्मानित करण्यात आले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. नरेश वैद्य, कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सुधीर महामुनी, प्रमुख उपस्थितीमध्ये शिक्षणाधिकारी माध्यमिक डॉ. महेंद्र गजभिये, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण सस्थेच्या अधिव्याख्याता पुनम घुले, विभागप्रमुख तथा अधिव्याख्याता डॉ. भाऊराव राठोड तसेच शालेय पोषण आहार चे जिल्हा अधीक्षक तथा लेखाधिकारी प्रवीण वैद्य हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने करून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व माता सरस्वती यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले.

राज्य शासनाच्या वतीने ही व्हिडिओ निर्मिती स्पर्धा एकूण सहा गटात घेण्यात आली होती. ज्यामध्ये शिक्षकांना आपले शैक्षणिक व्हिडिओ तयार करून ते राज्याच्या लिंक वर अपलोड करायचे होते. या स्पर्धेत जिल्ह्यातील जवळजवळ ८०० शिक्षकांनी भाग घेतला होता ज्यामधून तालुका स्तरावर ३३१ शिक्षक तर जिल्हास्तरावर ७५ शिक्षक पारितोषिकासाठी पात्र ठरले. जिल्हास्तरावरील पारितोषिकांमध्ये प्रथम पारितोषिक १०००० रुपये, द्वितीय पारितोषिक ९००० रुपये तर तृतीय पारितोषिक ८००० रुपये अशी बक्षिसांची रक्कम राज्य शासनाद्वारे निश्चित करण्यात आली होती.

तर तालुकास्तरावर प्रथम पारितोषिक ३००० रुपये द्वितीय पारितोषिक २००० रुपये आणि तृतीय पारितोषिक १५०० रुपये अशी रोख रक्कम शासनाने ठरविली होती. सोबतच सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देण्याचे निर्देश शासनाचे होते. त्याच अनुषंगाने आज हा जिल्हास्तरीय पारितोषिक बक्षीस वितरण समारंभ आयोजित करून ७५ शिक्षकांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या द्वारे देण्यात आले. सदर शिक्षकांना जिल्हास्तरीय पारितोषिकांची रोख रक्कम ६४४००० हजार रुपये त्यांच्या बँक खात्यात वळती करण्यात आले. तालुकास्तरीय बक्षिस वितरण समारंभ आयोजित करण्याची जबाबदारी ही सर्व गटशिक्षणाधिकारी यांना देण्यात आली आहे. तालुकास्तरीय बक्षिसांकरिता जिल्ह्यात एकूण ७५३००० रु. तरतूद करण्यात आलेली आहे.


# २१ वर्षात धानाच्या हमीभावात केवळ १७५० रुपयांची वाढ

## खर्च वाढला पाचपट : यंदा ४७८३ रुपये हमीभावाची शिफारस; पण मिळणार किती

**गोंदिया :-** राज्यात सर्वाधिक धानाचे उत्पादन हे पूर्व विदर्भातील पाच जिल्ह्यांमध्ये घेतले जाते. या जिल्ह्यात धानाचे १७ लाख हेक्टरवर क्षेत्र आहे. धानाच्या लागवड खर्चात दरवर्षी वाढत होत असून त्या तुलनेत धानाला मिळणार दर हा फारच कमी असल्याने धानाची शेती म्हणजे शेतकऱ्यांसाठी तोट्याचा सौदा झाला आहे. गेल्या २१ वर्षात धानाचा हमीभावात केवळ १७५० रुपयांची वाढ झाली असून उत्पादन खर्च मात्र पाच पट वाढला आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाने २०२४-२५ खरीप हंगामातील धानाच्या हमीभावात १८३ रुपयांनी वाढ केली त्यामुळे धानाला प्रति क्विंटल २३०० रुपये हमीभाव मिळला. आता सन २०२५-२६ करिता कृषी मूल्य आयोगाने केंद्र सरकारने धानाला ४७८३ रुपये हमीभाव मिळण्याची शिफारस केली आहे; पण प्रत्यक्षात किती वाढ केली जाते हे लवकरच कळेल. सन २००४ ते २०२५ पर्यंतच्या धानाच्या हमीभावावर नजर टाकल्यास त्यात केवळ १७५० रुपयांची वाढ झाली आहे. पण त्या तुलनेत शेतीच्या लागवड खर्चात पाचपट वाढ झाली आहे.

खते, बियाणे, मजुरी व इतर खर्चात भरसाठ वाढ झाली आहे. २० एकरी लागवड खर्च १२ ते १३ हजार रुपये होता तो आता २२ ते २५ हजारांवर पोहचला आहे; पण त्यातुलनेत हमीभाव मिळत नसल्याने धानाची शेती करावी कशी असा बिकट प्रश्न धान उत्पादक शेतकऱ्यांपुढे निर्माण झाला आहे.




### शेतकऱ्यांच्या मेहनतीला मोल मिळेना

**धानाच्या शेतीचा एकरी लागवड खर्च २२ ते २५ हजार रुपये आहे. तर एकरी १५ ते १८ क्विंटल धानाचे उत्पादन होते. सर्व खर्च जाता शेतकऱ्यांच्या हातात केवळ तीन ते चार हजार रुपये शिल्लक राहते. यामध्ये शेतकऱ्यांनी कुटुंबासह शेतीसाठी केलेली मेहनत व मजुरी जोडल्यास त्यांच्या हाती काहीच पडत नाही.**

**धानाचा हमीभाव जाहीर करताना केंद्र सरकारने शेतीचा लागवड खर्चासह शेतकऱ्यांनी वर्षभर कुटुंबासह राबलेल्या श्रमाचे मूल्यदेखील गृहीत धरले पाहिजे. धानाला मिळणार हमीभाव हा फारच अल्प असल्याने धान उत्पादक शेतकरी कर्जबाजारी होत आहे. त्यामुळे या सर्व गोष्टींचे केंद्र सरकारने ऑडिट करून हमीभाव देण्याची गरज आहे.**

**- विजय जावंधिया, शेतकरी नेते.**

**धानाच्या लागवड पाचपट वाढ झाली आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सुध्दा वाढ झाल्याने त्याचा सुध्दा परिणाम लागवड खर्चावर होत आहे. उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळेपर्यंत धान उत्पादकांची स्थिती सुधारणा नाही.**

**- गंगाधर परशुरामकर, धान उत्पादक शेतकरी.**

# डोंगरगाव येथील बंधाऱ्याचे काम केले निकृष्ट दर्जाचे

## चौकशी करुन कंत्राटदारावर कारवाईची मागणी : गावकऱ्यांनी वेधले लक्ष

**सुकडी डाकराम :-** तिरोडा तालुक्यातील डोंगरगाव येथील नाल्यावर जुन्या बंधाऱ्याचे बांधकाम करण्यात आले. यात कंत्राटदाराने नाल्याच्या आजूबाजूला खोदकाम करून मातीवर सिमेंट काँक्रीट टाकले. रेती व गिट्टीचा जास्त वापर करून त्यात सिमेंटचे प्रमाण कमी वापरले आहे. लोहा १८ ते २० इंचवर टाकण्यात आले आहे. या बांधकामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता असून, याची चौकशी करुन कंत्राटदारावर कारवाई करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली.



तिरोडा तालुक्यातील डोंगरगाव येथे जि.प. लघु पाटबंधारे विभागांतर्गत पाणी साठवण बंधाऱ्याची कामे सुरु आहेत. हे बंधारे जुने असून, काही बंधारे चांगले आहेत. तर काही बंधाऱ्यांची दुरुस्ती केली जात आहे. पण, संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी कंत्राटदारासह हातमिळवणी करुन जुन्या बंधाऱ्याच्या दुरुस्तीच्या नावावर शासनाला चुना लावण्याचे काम सुरु केले. हा प्रकार डोंगरगाव येथील नाल्यावरील बंधारा बांधकामावरून पुढे आला आहे. संबंधित कंत्राटदाराने बंधाऱ्याच्या आजूबाजूची माती जेसीबीने बंधाऱ्याच्या बेसच्या ठिकाणी मुरम ऐवजी माती टाकून त्यावर सिमेंट काँक्रीट केले आहे. यात रेती व गिट्टीचे प्रमाण जास्त वापरून थातूरमातूर काम करण्यात आले आहे.

या संदर्भात संबंधित कंत्राटदाराला विचारले असता त्यांनी अंदाजपत्रकानुसार काम करण्यात आले आहे. बांधकामाचा दर्जा सुध्दा चांगला असून, केलेले आरोप निराधार आहेत. हे काम जुने असून, यात लोखंड व गिट्टीचे प्रमाण योग्य असल्याचे सहाय्यक अभियंता रोगडे यांनी सांगितले.

# बांधकाम मजुरांना आता ग्रा.पं.अधिकारी देणार प्रमाणपत्र

## ९० दिवस इमारत व इतर काम केलेल्यांचा समावेश

**गोंदिया :-** ग्रामीण क्षेत्रांमध्ये इमारत व इतर बांधकाम मजुरांना ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र प्रमाणित करण्याचे अधिकार शासनाने ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे या प्रमाणपत्रासाठी पूर्वी बांधकाम मजुरांना जिल्ह्याच्या ठिकाणी करावी लागणारी पायपीट थांबण्यास मदत झाली आहे.



बांधकाम मजूर नसलेल्या लोकांनी बोगस प्रमाणपत्र तयार करून घेतले होते. अनेक नागरिक जे की, अशा कामावर जात नाही त्यांनीसुद्धा नोंदणीकृत ठेकेदार, अनधिकृत ठेकेदार यांच्याकडून ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र घेऊन ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडून प्रमाणित करण्याच्या सपाटा सुरू केला होता. यामुळे मोठ्या प्रमाणात बोगस मजुरांची नोंदणी झाली होती. वास्तविक बांधकाम व इमारत बांधकाम मजूर योजनेच्या लाभापासून वंचित राहत होते. ही बाब गांर्भीयाने घेत महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिकारी संघटना महाराष्ट्र राज्य यांनी संपूर्ण महाराष्ट्रात असे प्रमाणपत्र प्रमाणित करण्यावर बहिष्कार टाकला होता.

या संदर्भात शासनाशी चर्चा सुरू असून शासनाने ही बाब मान्य करूनही अजूनपर्यंत तोडगा निघालेला नाही. मात्र यामुळे जे खरंच इमारत बांधकाम व इतर बांधकाम मजूर आहेत त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत होते. गोंदिया जिल्हा हा आर्थिक मागासलेला असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात मजूर वर्ग अशी कामे करून आपली उपजीविका चालवितात.

### ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचा पुढाकार

**ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन यांनी अनेक मजूर वर्ग संघटना पदाधिकारी यांच्यासोबत चर्चा करून जिल्हा पुरता तोडगा काढला. जे बांधकाम व इमारत बांधकाम मजूर नाहीत त्यांनी अशी नोंदणी करू नये बोगस प्रमाणपत्र आणू नये व त्यांना प्रमाणित करण्याच्या आग्रह मुळीच करू नये या कृतीमुळे खरंच जे इमारत बांधकाम व इतर बांधकाम मजूर आहेत त्यांच्या मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. खरे लाभार्थी लाभापासून वंचित राहत आहेत त्यामुळे आपली नैतिक जबाबदारी समजून जे कामावर कधी जात नाही त्यांनी बोगस प्रमाणपत्र आणू नये आणि असे प्रमाणपत्राला आळा बसण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत.**

### बोगस प्रकार टाळण्यासाठी उपाययोजनांची गरज

**जे मजूर इमारत बांधकाम व इतर बांधकामाकरिता कामावर जातात त्या मजुरांनी ज्या संबंधित ठेकेदाराकडे ते कामावर जातात त्यांच्या स्वाक्षरीसह त्यांचे त्यांच्याकडे काम केल्याचे स्वयंघोषणापत्र द्यावे. त्याचप्रमाणे स्वतःचे स्वयंघोषणापत्र आम्ही त्यांच्याकडे काम केलेलं आहे आणि त्या मोबदल्यात आम्हाला एवढी मजुरी मिळालेली आहे अशा पद्धतीच्या स्वयंघोषणापत्र देण्यात यावे. संबंधित ठेकेदार यांचे आधार कार्ड त्यांच्या नोंदणी क्रमांक आणि त्यांच्याकडे काम केल्याच्या पुराव्याची झेरॉक्स प्रत ही पडताळणी करता संबंधित ग्रामपंचायत अधिकारी यांना उपलब्ध करून देण्यात यावी.**

# महाराष्ट्र एक्सप्रेसचा प्रवास होणार १ जूनपासून अधिक आरामदायी

## गाडीचे डबे वाढणार : रेल्वे विभागाची माहिती

**गोंदिया :-** गोंदिया-कोल्हापूर महाराष्ट्र एक्सप्रेसच्या संरचनेत बदल करण्यात आला आहे. प्रवाशांचा प्रवास अधिक आरामदायी व्हावा, यासाठी रेल्वे विभागाने पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र एक्सप्रेस ही १ जूनपासून नव्या रूपात धावणार आहे. त्यामुळे प्रवाशांसाठी ही आनंददायी बाब ठरणार आहे.

मध्य रेल्वे प्रवासी सुविधा आणि सुरक्षितता लक्षात घेऊन एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. याअंतर्गत गाड्यांमधील जुने रैंक आधुनिक लिंक हाफमन बुश डब्यांमध्ये रूपांतरित केले जात आहेत. याच अंतर्गत गोंदियाहून सुटणाऱ्या महाराष्ट्र एक्सप्रेसचे देखील एक एलएचबी कोचमध्ये रूपांतर करण्यात येत आहे.

या गाडीत १ द्वितीय वातानुकूलित कोच, ४ तृतीय वातानुकूलित कोच, ७ स्लीपर कोच, ४ सामान्य द्वितीय श्रेणी कोच, १ सामान्य द्वितीय श्रेणी कोच आणि १ जनरेटर कार असेल.

या बदलामुळे प्रवाशांना पूर्वीपेक्षा अधिक आरामदायी, सुरक्षित आणि सोयिस्कर प्रवासाचा अनुभव मिळेल. कोल्हापूर-गोंदिया एक्सप्रेस कोल्हापूर रेल्वेस्थानकावरून १ जून २०२५ पासून एलएचबी कोच आणि नवीन संरचनेसह धावेल. गोंदिया-कोल्हापूर एक्सप्रेस ३ जूनपासून गोंदिया रेल्वेस्थानकावरून एलएचबी कोच आणि नवीन संरचनेसह धावेल. अशी माहिती प्राप्त झाली आहे.

### तृतीयपंथीयांवर कारवाई

**दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे नागपूर विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांच्या निर्देशानुसार, वरिष्ठ विभागीय व्यावसायिक व्यवस्थापक दिलीप सिंग आणि विभागीय सुरक्षा आयुक्त दीप चंद्र आर्य यांच्या संयुक्त मार्गदर्शनाखाली, रेल्वे संरक्षण दल आणि वाणिज्य विभागाचे अधिकारी, टीटीई कर्मचारी यांची संयुक्त टीम तयार केली आहे. ट्रेन आणि प्लॅटफ फॉर्मवर बेकायदेशीर विक्री करणाऱ्या विक्रेत्यांना आणि ट्रेनमध्ये प्रवाशांना अश्लील चाळे करून त्रास देणाऱ्या आणि पैसे मागणाऱ्या तृतीयपंथीयांवर कारवाई करण्यात आली.**



### एमएसटी धारकांसाठी तीन कोचमध्ये सुविधा

**गोंदिया-कोल्हापूर महाराष्ट्र एक्सप्रेसच्या स्लीपर कोचमध्ये केलेले बदल लक्षात घेऊन आणि प्रवाशांच्या सोयीसाठी, सक्षम प्राधिकरणाने गोंदिया-नागपूर विभागात मासिक पासधारक, अर्धवार्षिक पासधारक तिकीटधारकांसाठी ३ विशेष स्लीपर कोच एस ५, एस ६ आणि एस ७ या कोचमधून प्रवास करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. ही सुविधा गोंदियातून ३ जूनपासून लागू होईल. मासिक पासधारक, अर्धवार्षिक पासधारक तिकीट धारकांना प्रवास करताना गैरसोयीचा सामना करावा लागू नये. एसपीसी नागपूर विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक दिलीप सिंग यांनी ही माहिती दिली.**

# उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी उपाययोजना

**गोंदिया :-** मार्च महिना शेवटच्या टप्प्यावर असतानाच उन्हाचे चटके वाढले आहेत. अशात हवामान विभागाने एप्रिल महिन्यापासून उन्हाच्या झळा तीव्र होणार असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. बुधवार २६ मार्च रोजी गोंदिया जिल्ह्याचे तापमान ३८ डिग्री सेल्सीअस आहे. विशेष म्हणजे मार्च महिना शेवटच्या टप्प्यात आला असून पुढील सहा दिवसात मात्र तापमानात वाढ होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे.



भारतीय हवामान विभागाद्वारे सद्यस्थितीत विविध ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात येत आहे. राज्यात उष्णतेच्या लाटेचा प्रभाव वाढत्या प्रमाणात राहण्याची शक्यता गृहीत धरुन उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी काय करावे व काय करु नये याबाबत पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

**काय करावे :-** तहान लागली नसली तरीसुध्दा जास्तीत जास्त पाणी प्यावे. हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. बाहेर जातांना गॉगल्स, छत्री/टोपी, बुट व चप्पलचा वापर करावा. प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत घ्यावी. उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापर करावा, तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकण्यात यावा. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस, घरी बनविण्यात आलेली लस्सी, तोरणी, लिंबूपाणी, ताक इत्यादींचा नियमीत वापर करावा. अशक्तपणा, स्थुलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. गुरांना छावणीत ठेवावे, तसेच त्यांना पुरेसे पिण्याचे पाणी दयावे. घर थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करावा. रात्री खिडक्या उघड्या ठेवण्यात याव्यात. पंखे, ओले कपडे यांचा वापर करण्यात यावा. तसेच वेळोवेळी थंड पाण्याने आंघोळ करावी. कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. सूर्य प्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सूचित करण्यात यावे. पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा. बाहेर कामकाज करीत असताना मध्ये मध्ये ब्रेक घेऊन काम करावे. गरोदर कामगार व आजारी कामगारांची अधिकची काळजी घेण्यात यावी. उन्हापासून संरक्षणाकरीता रस्त्याच्या कडेला शेड उभारावेत. जागोजागी पाणपोईची सुविधा करण्यात यावी.

**काय करु नये :-** लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नये. दुपारी १२ ते ३.३० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे. गडद, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे. बाहेर तापमान अधिक असल्यास शारिरीक श्रमाची कामे टाळावीत. दुपारी १२ ते ३.३० या कालावधीत बाहेर काम करणे टाळावे. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळण्यात यावे, तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावी. उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी अशाप्रकारे उपाययोजना कराव्यात, असे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांनी कळिवले आहे.

# जि.प. शाळेतील ७८३ शिक्षकांची पदे रिक्त, ३ तालुक्यांना शिक्षकांची नापसंती

**गोंदिया :-** जिल्हातील जिप शाळांमध्ये पटसंख्या असूनही विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षक नाहीत. परिणामी पाल्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने पालक व ग्रामस्थ शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी शिक्षणाधिकाऱ्यांसह गटशिक्षणाधिकाऱ्यांना साकडे घालत आहेत.

पदवीधरांची १९० तर सहाय्यक शिक्षकांची ५५० पदे रिक्त: गोंदिया जिल्ह्यातील पदवीधर शिक्षकांची ९३३ पदे मंजूर असताना त्यातील ७४३ जागा भरल्या आहेत. तर १९० जागा रिक्त आहेत. सहाय्यक शिक्षकांची २६१४ पदे मंजूर असताना त्यातील २ हजार ६४ जागा भरल्या आहेत. तर ५५० जागा रिक्त आहेत.रिक्त पदाने शिक्षण विभागाचा ताण वाढविला आहे. कंत्राटी शिक्षक भरती करून ओरड कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तरीही अनेक शाळांमध्ये शिक्षक नसल्याने या विद्यार्थ्यांना शिकविणार कोण, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. गोंदिया जिल्ह्यात २१.१०% टक्के शिक्षकांची पदे रिक्त आहेत. जिल्हा परिषद शाळांच्या इमारती जीर्ण झाल्या आहेत. त्या पाडून त्या ठिकाणी नवीन बांधकाम करणे आवश्यक आहे. मात्र, निधीची अडचण पुढे करून केवळ डागडुजी करण्यात येत आहे. या धोकादायक इमारतीत बसून विद्यार्थ्यांना शिक्षण घ्यावे लागत आहे. याशिवाय सुरक्षा भिंत, वीज, शौचालय आदी सुविधांचाही अभाव आहे.

### ७८३ शिक्षकांची पदे रिक्त

**जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये जवळपास ७८३ शिक्षकांची पदे रिक्त आहेत. त्यातही शिक्षक सेवानिवृत्त होत असल्याने हा आकडा फुगत चालला आहे. शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी असल्याची ओरड यापूर्वी ऐकायला मिळाली. मात्र, बहुतांश शाळांमध्ये पटसंख्या असूनही शिक्षक मिळत नाहीत.**

### कंत्राटी शिक्षकांची भरती

**नुकसान होऊ नये, दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी खासगी शाळांमध्ये टाकण्याकडे कल वाढला चालला आहे, तर जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षक मिळत नसल्याने पटसंख्या टिकणार आणि वाढणार कशी, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत आता कंत्राटी शिक्षकांची भरती करण्यात आली आहे.**



### ३ तालुक्यांत शिक्षक जायला तयार नाहीत ?

**जिल्ह्यातील ८ तालुक्यांपैकी देवरी, सालेकसा, अर्जुनी-मोरगाव या तीन तालुक्यांच्या नक्षलग्रस्त भागात शिक्षक जायला तयार नाहीत.**

# बिरसी विमानतळावर आता नाइट लॅन्डिंग शक्य

## डीजीसीएची मिळाली परवानगी : खासगी विमान कंपन्यांना होणार मदत

**गोंदिया:-** तालुक्यातील बिरसी विमानतळावर नाइट लॅन्डिंगची सुविधा आयएलएस यंत्रणा काढल्याने बंद झाली होती. ही यंत्रणा आता पूर्ववत लावण्यात आली असून आल वेदर ऑपरेशन (आईएफआर) करिता डीजीसीएने परवानगी दिली आहे. त्यामुळे कमी दृश्यतामान व खराब वातावरणात आणि रात्रीच्या वेळेस बिरसी विमानतळावर विमान उतरविणे शक्य होणार आहे. ही यंत्रणा लवकरात लवकर कार्यान्वित व्हावी यासाठी खा. प्रफुल्ल पटेल, भारतीय विमान प्राधिकरण व्यवस्थापन व बिरसी विमानतळ येथील अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली. अनेकदा वातावरणात बदल होत असतो. अशावेळी बिरसी विमानतळावर विमान उतरवायचे की नाही असे प्रसंग अनेकदा निर्माण झाले होते. पण आता यावर कायमस्वरूपी मार्ग निघाला आहे.

आता वातावरण खराब असले तरी बिरसी विमानतळाला डीजीसीएद्वारे ऑल वेदर ऑपरेशनची परवानगी मिळाली आहे. तसेच आयएलएस ही यंत्रणा कार्यान्वित झाल्याने या विमानतळावर रात्रीसुद्धा विमान उत्तरविणे शक्य झाले आहे. यामुळे बिरसी विमानतळावरून प्रवासी विमान वाहतूक सेवेलासुद्धा बळ मिळणार आहे.

तर लवकरच या विमानतळावर कैट १ ॲप्रोच लायटिंग सिस्टम लावण्यात येणार आहे. त्यामुळे ८०० मीटर दृश्यतामानात विमानतळावर लॅन्डिंग करणे शक्य होणार आहे. तसेच विमानतळाच्या धावपट्टीच्या क्षेत्रात वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरू करणाऱ्या विमान कंपन्यांनासुद्धा याची मदत होणार आहे. त्यामुळे जिल्हावासीयांसाठीसुद्धा ही दिलासादायक बाब आहे.



### गोंदिया-इंदूर विमान सेवा एप्रिल महिन्यापासून

**बिरसी विमानतळावरून गोंदिया-इंदूर विमानसेवा याच महिन्यापासून प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरू केली जाणार आहे. यासाठी एका खासगी विमान कंपनीने कंत्राट घेतले आहे. यामुळे गोंदिया जिल्ह्यातील प्रवाशांना याचा लाभ होणार आहे.**

**बिरसी विमानतळ येथे आल वेदर ऑपरेशन सुविधा झाल्यामुळे खराब वातावरणात आणि नाइट लॅन्डिंग करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे आता विविध विमान कंपन्या या विमानतळाचा उपयोग करू शकतात. तसेच भविष्यात या विमानतळावर विविध मार्गांवर प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरू करण्यास यामुळे मदत होणार आहे. बिरसी विमानतळासाठी ही महत्त्वपूर्ण बाब आहे.**

**गिरीशचंद्र वर्मा, बिरसी विमानतळ संचालक**

# अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांच्या पदभरतीवर प्रश्नचिन्ह

## आरक्षित गटांवर अन्याय : उमेदवारांनी केला आरोप

**नवेगावबांध :-** महाराष्ट्र शासनाने २०१७ मध्ये शैक्षणिक संस्थांना धार्मिक अल्पसंख्याक दर्जा प्रदान करण्यासाठी एक महत्त्वाचा शासन निर्णय काढला होता. या निर्णयाच्या मदतीने अनेक शैक्षणिक संस्थांनी अल्पसंख्याक दर्जा प्राप्त केला आणि त्याअंतर्गत पदभरती प्रक्रियेत आरक्षण नियमांना बगल देण्याचा मार्ग निवडला. परिणामी, मोठ्या प्रमाणावर शिक्षक व कर्मचारी भरती करताना आरक्षित गटांवर अन्याय होत असल्याची ओरड वाढली आहे.

हा जीआर लागू झाल्यापासून अनेक संस्थांनी मोठ्या प्रमाणावर पद?भरतीसाठी मंजुरी मिळवली आणि त्याआधारे पदभरती केली जाते. मात्र, यात पारदर्शकतेचा अभाव दिसून येतो. अनेक संस्थांमध्ये धनाढ्य उमेदवार या स्पर्धेत असतात व याचा फायदा घेत संस्थाचालक घेत असल्याचे पुढे आले आहे. या प्रक्रियेमुळे आरक्षण धोरणाला मार बसत असून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय गटातील उमेदवारांना संधी मिळत नाही. शासकीय वेतन असलेल्या या पदांवर संस्था चालकांचे वर्चस्व निर्माण झाले आहे. त्यामुळे आरक्षित गटातील उमेदवारांवर अन्याय होत असल्याचे आरोप होत आहेत.

### न्यायालयीन हस्तक्षेपाची भासत आहे गरज

**न्यायालयाने स्वतःहून यावर दखल घेऊन चौकशी करण्याची गरज आहे. धार्मिक अल्पसंख्याक दर्जा प्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये खरोखर अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थी शिक्षण घेतात का, याचीही शहानिशा करणे गरजेचे आहे. शासनाने अल्पसंख्याक दर्जा देताना ठरवलेल्या टक्केवारीचे पालन होते का, याचीही तपासणी करावी. तसेच अशा संस्थांनी घेतलेल्या डोनेशनवर कारवाई करणेही आवश्यक आहे. नियमबाह्य भरती झाल्यास ती रद्द करून जबाबदार व्यक्तींवर कडक कारवाई केली जावी, अशी मागणी उमेदवारांकडून केली जात आहे.**

### शैक्षणिक क्षेत्रावर परिणाम

**या जीआरमुळे जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षक भरतीस अडचण निर्माण झाली आहे. अल्पसंख्याक संस्थांना दिल्या जाणाऱ्या सवलतींमुळे इतर शाळांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. परिणामी, गुणवत्ताधारित भरती प्रक्रिया संकटात सापडली आहे. यावर शासनाने तातडीने पावले उचलून या जीआरच्या अंमलबजावणीतील त्रुटी दूर करण्याची मागणी केली जात आहे.**

# हुक्का पार्लरवर गुन्हे शाखेची रेड

## पाल चौकातील पार्लरवर केली कारवाई : हुक्का, विविध फ्लेव्हरचा माल केला जप्त

**गोंदिया :-** ग्राहकांना प्रतिबंधित असलेला निकोटिनयुक्त हुक्का फ्लेव्हर देत असलेल्या हुक्का पार्लरवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धाड घातली. रामनगर पोलिस ठाण्यांतर्गत पाल चौकातील डॉ. आभा सोनकिया यांच्या दवाखान्याजवळील हुक्का पार्लरवर शनिवारी (दि. २९) रात्री ९:४५ वाजता दरम्यान ही कारवाई करण्यात आली.

शहरातील पाल चौकातील डॉ. आभा सोनकिया यांच्या दवाखान्याच्या इमारतीत पहिल्या माळ्यावर आरोपी विनोद ओंकार भांडारकर (३५, रा. बाजपेई वॉर्ड, गोंदिया) याचे हुक्का कॅफे अंड टॉम्स कॅफे अंड हर्बल हुक्का पार्लर असून तेथे ग्राहकांना हुक्का फ्लेव्हर न देता नियमांचे उल्लंघन करून निकोटिन असलेले फ्लेव्हर दिले जात होते. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शनिवारी (दि. २९) रात्री ९:४५ वाजण्याच्या दरम्यान कॅफेतर छापा टाकला. यामध्ये पथकाला कॅफेमध्ये तीन टेबलवर हुक्का ठेवून निकोटिन असलेले फ्लेव्हर पुरवीत असल्याचे दिसून आले. पोलिसांनी छापा टाकला असता तेथून दोघेजण पळून गेले. या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलिस उपनिरीक्षक शरद सैदाने यांच्या तक्रारीवरून रामनगर पोलिसांनी सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादन आणि वितरण नियमन कायदा २००३ महाराष्ट्र सुधारित अधिनियम २०१८, कलम ४ (अ), २१ (अ) अंतर्गत गुन्हा नोंद केला आहे.



### पार्लरमधून जप्त केला ११, ७१० रुपयांचा माल

**या धाडीत पथकाने पार्लरमधून तीन हजार रुपये किमतीचे काचेचे तीन हुक्का पॉट पाइपसह, १०० रुपये किमतीचा स्टीलचा ॲश ट्रे, ९६० रुपये किमतीचे अल अयान कंपनीची पान रजनी फ्लेव्हरची आठ पाकिटे, ८०० रुपये किमतीची रॉयल स्मोकिंग कंपनी किवी ब्लास्ट फ्लेव्हरची आठ पाकिटे, ६०० रुपये किमतीची रॉयल स्मोकिंग कंपनीची मधई पान रजनी फ्लेव्हरची पाच पाकिटे, एक हजार रुपये किमतीची व्हाईट रोझ फ्लेव्हरची १० पाकिटे, पाच हजार रुपये किमतीची वेगवेगळ्या कंपनीची वेगवेगळी ५० फ्लेव्हर पाकिटे तसेच २५० रुपये किमतीची कोकोनट चारकोलची पाच पाकिटे असा एकूण ११ हजार ७१० रुपयांचा माल जप्त केला आहे.**